
# सकीना

वसंत बापट



MR
891.46182
B 228 S

MR
891.461
82
B 228 S

वसंत बापट यांचे इतर साहित्य

**कवितासंग्रह**

बिजली

सेतु

अकरावी दिशा

**ललित लेख**

बारा गावचं पाणी

**बाल नाट्य**

बाल गोविंद

Sakina

# सकीना

Vasant Bapat

वसंत बापट

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

Popular, Bombay

Library IIAS, Shimla
MR 891.46182 B 228 S
00055483

MR
891.46182
B 228 S

© वसंत बापट

पहिली आवृत्ती
१९७५/१८९६

म-३८५

55483
16·11·76

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
‘ शिव-पार्वती ’
४६१/४ सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे ४११०३०

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ४०० ०३४

12/12

# अनुक्रम


१ सकीना १
२ फुला तुझे दुःख २
३ कोळी आणि चिडिया ३
४ कहाणी ४
५ जुगारी ५
६ कौल ६
७ पिळवटून हृदय ७
८ लाडकी आहेस म्हणून सांगतो ८
९ तुझी स्मृती ९
१० तात्पर्य १०
११ माझी करडी सावली ११
१२ तुझ्यापाशी दिवा १२
१३ शिशिरात शिरा गोठलेल्या अशा १३
१४ कोणत्या मोहना ओलांडिले १४
१५ दिवा १५
१६ पूर १६
१७ हीरो १७
१८ ट्रॅजेडी १९
१९ समाधी २०
२० फकीर २१
२१ बाहूत तू बांधू नको २२
२२ विषारी कळ्यारी २३
२३ हस्ताचे गाणे २४
२४ दिवाणा २५
२५ संकेत २६
२६ सांभाळ २७
२७ सायली २९

२८ पराभूत ३०
२९ एक ३१
३० व्यभिचार ३२
३१ एकटा ३३
३२ व्रत ३७
३३ गुरू ३८
३४ एका कुमाराची कहाणी ४१
३५ मायकेलँजेलोपनिषद् ४३
३६ नुकत्याच उगवलेल्या कविमित्रास ४७
३७ मोक्ष ४९
३८ आबाद ५०
३९ पंधरा ऑगस्ट ५१
४० मानवाच्या दुःखाचे मूळ ५२
४१ व ळमूठ वज्रघाव ५५
४२ या गनिमाला ५७
४३ विनवणी ५९
४४ दुष्काळ ६०
४५ कंत्राट ६२
४६ केनेडी ६३
४७ खोपट ६४
४८ किती सहज ६५
४९ कॉम्रेड्स ६६
५० जंगल ६८
५१ शेवटची लढाई ७१
५२ सावंत ७२
५३ सिंद्बादची अखेरची सफर ७६
५४ आमच्या पणतवंडांना एवढे सांगा की ८१
५५ श्रावण ८२
५६ जॅकरँडा ८३

५७ मांडूचा दिवस ८५
५८ मांडूची रात्र ८७
५९ शांतिनिकेतन : प्रथम दर्शन ८९
६० आदिरहस्य . ९१
६१ पत्र ९५
६२ लामा ९९
६३ भीष्म १००
६४ मी जिथे जातो तिथे १०१
६५ डोळेभेट १०२
६६ चंद्रोदय १०३
६७ समज नव्या मातीत मिसळलो १०४
६८ ती कहाणी संपली १०५
६९ निराळा १०६
७० स्वप्नलता १०७
७१ लावणी : जुन्या ओळखीची ! १०८
७२ लावणी : कार्तिकाची १०९
७३ लावणी : इवलीची १११
७४ लावणी : अखेरच्या विनवणीची ११२

# १. सकीना

सैल लहंगा विलगे अंगा फुलवेलाची वर नक्षी
नक्षीमधुनी अलगद उडुनी दडले नवलाचे पक्षी
पैजाम्याचे पंख फुलारुन गिरकी घेता नाजुकशी
खोल कुठे तरि तोल जाउनी जरा पुढे तू का झुकशी ?
कमालखानी हार इमानी तिरप्या मानेवर खुलती
रेशिमगोंडे लाडे लाडे पाठीवर रुमझुम झुलती
कटिवर पट्टा, उरीं दुपट्टा, चंचल बिंदी भांगात
हळदी तळवे झाले हळवे खेळुन मेंदीरंगात
किती कोवळा गौर गारवा तुझ्या भुजांच्या स्पर्शात
कशिदावाले रेशिम झाले हलकेफुलके हर्षात
महिरपवासी ओठ मिजासी कव्यारकातिल नाक तुझे
नैनांमधुनी ऐना तळपे... उमजावे ते मी उमजे
तुला न ठेविल सदा सलामत जर या मालिक दुनियेचा
कसा, सकीना, यकीन यावा कमाल त्याच्या किमयेचा !

## २. फुला तुझे दुःख

फुला तुझे दुःख तुला मात्र ठावे
एरांनी म्हणावे सदा सुखी !
इवल्या गाभ्यात आकाशाचे मौन
पाकळी गाळून हसायाते !
मध्यान्हींचा ताप मुकाट झेलावा
मधाचा ओलावा जगासाठी
मातीने धाडला निरोप चोरून
येई रे फिरून माझ्या पोटीं

## ३. कोळी आणि चिडिया

चिडीचूप झाले तरी गडी आपला जागा
आपल्या आतड्याचा काढतो मऊसूत धागा
मग पुसून निमूटपणे धीरोदात्त डोळे
मजेमध्ये विणत बसतो अष्टकोनी जाळे

स्वतापासून दूर होऊन निरखून बघतो घर
न सरणाऱ्या सरळ रेषा, फिके रंग वर
ओढ लागून जवळ येतो पुन्हा स्वतापाशी
तोच मघा कोळी होता, आता तोच माशी

ओल्या ओल्या डोळ्यांखाली हळूच हलतो देठ
धाग्यांवरती धरते काही दवासारखे थेट
झपाट्याने पुन्हा एकदा अलग होतो जरा
आणि म्हणतो, ‘ भला देवा कोळी केलो बरा ’

उजाडते अन्‌ चिडिया साऱ्या चिवचिवतात पुन्हा
‘ अय्या कित्ती छान ’ म्हणतात जाळ्यावरच्या उन्हा

## ४. कहाणी

अर्ध्यावर राहुन गेली प्रेमकहाणी
दोघांची हृदये उरली दर्ददिवाणी
नको उगा निःश्वासांचे जागर रात्री
नको मुळी तरळायाला नयनीं पाणी
ही अशीच होती नियती दोष कुणाचा
जिंदगीच अमुची झाली एक विराणी
या जन्मीं योगच नव्हता काय करू या !
आसवांत नाहुन आली अमुची गाणी
जाहली कमी न कमाई अमुच्या हातीं
हासतील या वेडाला सर्व शहाणी
हसा हसा दुनियेमधल्या यशवन्तांनो,
करमणूक केली तुमची इतुकी कोणी ?

## ५. जुगारी

जिंकतो त्याच्या नसांमधली हळूच जाते हवा
हरणाऱ्याची जिद्द कशी ठाय रोवी पाय
दान पडते मोठे तेव्हा दानत होते कमी
हरलो तरी पट कधी फेकून देईन काय

असे पहा ज्याच्याजवळ कवड्या हव्या तशा
त्याने अगदी हसत हसत जिंकली असते बाजी
तरी त्याच्या डोळ्यांवरती धरते तुपाळ साय
माझ्या डोळ्यांमधली जखम अजून आहे ताजी

अपशकुनाचा माझा हात ! पडून पडणार किती !
त्यांत तुझे दोन दहा एक सहा घाल
माझ्या हातावरल्या पुसल्या जितक्या जुन्या रेषा
तितके त्यांत मिळव, समज तेवढे पडते काल–

– तर डाव माझा होता ! का आले हसू ?
आपले काय ! मांडा पट ! पुन्हा एकदा फसू !

## ६. कौल

आठवते ?......तुझ्या दारी
आलो होतो आपोआप...
जीभ लोळते बाहेर
आत लागलेली धाप...
आणि तुझ्या पायांवर
कसाबसा कोसळलो
' बैस असा ' म्हणालीस
पाठीवर देत थाप !
तेवढ्याने फुशारून
पुन्हा भाता फुगवला
क्षय विसरून, चंद्र
उमेदीने उगवला
' किती फिकट चांदणे '
कुणालासे म्हणालीस
आणि तरी उरी माझ्या
चंद्र आहे जगवला
असो ! माझा निवारा घे
लीलाविहाराला तुला
श्वासनिःश्वासांचे पंखे
तुझ्यासाठी माझ्या फुला
कसा प्राक्तन प्राजक्त
सायंकाळीं उमलला
मला कौल दिला त्याने
तुला गंध नाही आला ?

## ७. पिळवटून हृदय

पिळवटून हृदय तुला सांगतो काही तरी
तू म्हणतेस – पुरे पुरेत प्राजक्ताच्या सरी
मग माझ्या पांडित्याची मला वाटते लाज—
याच्यापेक्षा वेडाबगडा थोडा असतो आज
तर तुला पटला असता सच्चेपणा तरी
माझी विद्या झाली आहे माझी मारेकरी.

शब्द शब्द शब्द ! सारे शब्द अर्थहीन...
जेवढी जास्त शक्ती तेवढा माणूस अधिक दीन.
तरी बरे शेली पूर्वी सांगून गेला आहे,
' शब्दामध्ये प्रकट होता प्रेम कुठे राहे ? '
( पहा दिलेस आता देखील मानेला तू झोले
तुला वाटते विठु कसा मिठु मिठु बोले ! )

जाऊ दे ते... हसू-आसू-मौन यांचे बोल
त्यांना तरी अर्थ असतो खरा आणि खोल ?

## ८. लाडकी आहेस म्हणून सांगतो

लाडकी आहेस म्हणून सांगतो, लहान असतो आपण
भले आणि बुरे यांचे डोळ्यांवरती ढापण
घर, बंगला, वाडा, चाळ...सारी एकच मिती
दोन दारे, चार खिडक्या, भिंतीएवढी भिती
कुठे तरी आजोळ असते, घरीं असतात मुले
पूजेपुरता देव असतो, देवापुरती फुले
जिथे असतात बाप, दादे, काके, मामे कुणी
पाप पुण्य यांची बेरीज होते अधिक उणी
पण जिथे काल आणि आज यांचा सांधा
निखळलेला असतो, तिथे घर कुणी बांधा ?
' एकजात सारे गुलाब उद्या होणार माती '
अशी भविष्यवाणी जिथे, तिथे कसली नाती ?
अशा ठायीं पाप-पुण्य तबकामधून न्यावे
नग्न नग्न अग्नीमध्ये नग्न भस्म व्हावे

## ९. तुझी स्मृती

तुझी स्मृती जागी होता दिवे मालवावे
काळजातल्या एकांतीं तुला बोलवावे

मूढ भारल्या हृदयाला गूढ भास व्हावे
पुन्हा जुन्या अभिमानाने आत कालवावे

दूर देवळात हलावा डोह मारव्याचा
तप्त पापण्यांचे माझ्या काठ ओलवावे

संपली कहाणी वेडे, मी मला म्हणावे
तरी त्याच राखेमधुनी वेल पालवावे

कसा भोग आयुष्याचा कोरला कपाळीं
छिन्नभिन्न कंठानेही गीत आळवावे

# १०. तात्पर्य

एकदा काय झालं
पहाटे झुळुकीच्या चोरट्या स्पर्शाने
अंगभर फुलांनी प्राजक्त डवरला
वठलेली फांदीही शहारली थरारली
खरबरीत पानेही दवाने ओलावली
काय बरं सांगत होतो...?
नेहमीप्रमाणे पहाटेच्या स्वप्नात
तुझी माझी भेट झाली.

डोहाच्या वर्मावर लागलेल्या खड्याने
वलयांतून निघाली वलयांकित वलये
कोवळ्या वयामध्ये जिव्हारीं जखम होते
जखम भरली तरी वेदना मरत नाही
पुन्हा विषयांतर !
मुद्दा एवढाच आहे...दुखावल्या प्राणांतून
उमलतात गाणी

शहाणे आयुष्य एक प्रदीऽऽर्घ कंटाळा
असंख्य कामांचे अनन्वित हिशेबठिशेब
अतर्क्य शक्तीने माणसाला सांगितलेली
कापुसकांद्याची न सरती गोष्ट
तात्पर्य एवढेच
अशीच केव्हा तरी भेटत जा अधून मधून.

## ११. माझी करडी सावली

तुझ्या जीवनाची उषा आता कुठे उमलली
नको तिथे पडायाला माझी करडी सावली
आत्ता आत्ता तुझे डोळे भोळेपणी उघडले
वैराणात हिंडताना माझी पापणी बावली
तुझ्या आव्हानाचा अर्थ मीही अव्हेरला नाही
माझी अतृप्त तहान तुझ्यामुळे आसावली
खूप सोसले, सोसतो, सोसणार आहे सारे
त्याची कथा ऐकू नको अर्थशून्य शब्दावली
मला भास झाला होता सुख पाहुणेरा आले
आले उत्सुक वेगाने गेले चोरट्या पावलीं
हसा, खेळा, नाचा बरे खळाळत रहा, वहा
माझ्या जिवाची असोशी आहे बरे विसावली...

## १२. तुझ्यापाशी दिवा

तुझ्यापाशी दिवा माझ्यापाशी रात्र
तरी गात्रगात्र अंधारले !
तुझ्यापाशी मेघ माझ्यापाशी चोच
तरी असतोच तहानेला !
तुझ्यापाशी माया माझ्यापाशी भूक
जुळे आपसूक सारे काही
सारे दान देता झालीस संपन्न
होतो मी विपन्न तैसा आहे ! !

## १३. शिशिरात शिरा गोठलेल्या अशा

शिशिरात शिरा गोठलेल्या अशा
पूर यावा कसा रक्तालागी ?
खेळ झाला सारा तोडल्या पाकळ्या
पुन्हा त्यांच्या कळ्या कैशा व्हाव्या ?
तरी अस्ताचलीं प्रकटसी प्राची
जाणीवही याची नाही तुला
हेही माझे गीत फक्त माझ्यास्तव
कशाला विस्तव लावू तुला ?

# १४. कोणत्या मोहना ओलांडिले

धावताना नाही थांबण्याचे त्राण
आपुलेच प्राण ओझे झाले !
मृगजळापायी मावळला दीस
आता कासावीस कशासाठी !
घराच्या दाराशी हरवले घर
पडला विसर माझा मला
निघालो जेथून तेथे आलो पुन्हा
कोणत्या मोहना ओलांडिले ?

## १५. दिवा

माझ्या खिडकीचा फडफडे डोळा काळोखडोहाच्या काठीं
इथे सोडवतो मनात गुंतल्या जुनाट धाग्यांच्या गाठी
लवत्या विजेच्या पिंपळफांदीने उद्ध्वस्त उत्तरपार
थिजल्या काचेला पडतात तडे उल्केची लागून गार
ढगांच्या सांदीत आसवे सांडीत जगाचे अनाम दुःख
मनाच्या जखमांभोवती फिरती स्मृतींचे गिधाडपंख

डोहाच्या कुशीत शिरता शिरता चिरते अंधारधार
क्षणाच्या प्रकाशगंगेच्या किनारीं गावती शिंपले चार
वाढत्या अंधारधारेच्या पुरात सोडतो निःश्वासदीप
त्यांच्या असहाय झोकांड्या पहात उभा मी काठासमीप
षंढ समजूत घालीत सांगतो झोकांड्या खाणाऱ्या जिवा
तूही असशील असा असहाय कोणाचा निःश्वासदिवा !

## १६. पूर

खोल दक्षिणेला गाजत रहातो काळ्या कावेरीचा पूर
उंच उत्तरेला असेल लागला गहिरा पंचम सूर
कारंजासारखा उसळे अंधार तुषार तुषार छरा
किती सावरले... तरीही चित्राला पडत जातात चिरा

ओल्या अंधारात भिजता भिजता भाजून निघती नसा
दिवा लावावा तो अधिक भयाण अंधार घेरतो असा
निवांत मनात कोणाचे नूपुर कळेना वाजती असे
काळोख्या वाटेत कसे उमटती नाजुक कुंकुम-ठसे

धन्य धन्य सारे दिव्य पुण्यवंत निर्धास्त निद्रेचे धनी
उत्तररात्रीत आसरा घेतात पिशाचे मोडक्या मनी
अरे जीवन्मृता ! तुला रे कशाला कुसुंबी जलाल घोट ?
तुझ्यासाठी आहे दुसऱ्या जन्माच्या मात्रेचे मधाचे बोट !

अंधार गाजतो... हजार छायांचा आवाज वाहतो दूर...
माझ्या तोंडावर थुंकतात साऱ्या... त्याचाच वाढतो पूर
बुडताना तरी बुडावे सरळ... तेही ना बळ देहात
अपुऱ्या रेशिमधाग्याचा आधार शोधिती लाचार हात

## १७. हीरो

चारचौघे तुझे नाव पचापचा घेतात
तिथे मी पाचवा असतो
' हलकट भुस्कटानो ! मुस्कट फोडून टाकीन
तिचं नाव काढाल तर '
वशाच्या झडपेजवळ काळीज उसळून येतं
पण जीभ लुळी पडते...
नव्हेसनेस जाण्यासाठी मी थोडी स्कॉच घेतो
चारचौघे कंपनी देतात
सेकंड हीरो आणि पेटंट व्हिलन ग्लास भिडवतात
' To the hea t ı of the beautiful bitch,'
पंडितजी कुचकुचतात...स्त्रियश्चरित्रम्...
फडतूस एक्स्ट्रॉ पुरुषभाग्याची फुशारकी मारतो
सगळे सोड्यासारखे फसफसतात...छोडो यार...
आपण तर एक कडक डबलपेग चढवतो...
एक्स्ट्रॉच्या पाठीत लाथ घालायची ॲक्शन विसरून
मी त्याला एक जिगरी टाळी देतो.

जाग्रणानंतरचा नशीला निद्रानाश...
पिक्चर सुरू होते...फिलम तुटते...पुन्हा सुरू...
प्राजक्ताखाली तू उभी असतेस...ओले तळहात...क्लोजअप...
डिझॉल्व...तुझ्या वरातीचा लाँगशॉट...डमरूसारख्या कमरेला
तुझ्या नवऱ्याचा विळखा...कट...शहनाई बथ्थड वाजली !
NEXT...हिरवे निळे वळ उठलेले तुझे गाल...मी त्यांचं
एक...Cut...साला सेन्सॉर बोंब मारील...लाँगशॉट...

रेसकोर्स...डिझायर आणि डार्क पॅशन...साले नेक टू नेक...
तू इथे ? तो गॉगलवाला कोण...Ah yes...पॉप्युलर व्हिलन
मॉब...खूप मॉब...मघाचा एक्स्ट्रॉ तुझ्या पाठमोऱ्या
आकृतीकडे पाहतो आहे...मॅड मॅड...तुझ्या पुठ्ठ्यावर साले
पैसे लावताहेत...ॲनिमेशन...तू एक जातिवंत घोडी...चौखूर
उधळणारी...ठाणबंद तोडणारी...रन, माय फेअर लेडी...
बकप बकप...कमॉन माय फेअर लेडी
काय सालं रूप आहे...काय फॉर्म आहे...
काय मस्तवाल चाल आहे...साली व्हॉट फेव्हरिट आहे...
कट...काही खरं नाही आज...पॅकप...हीरो तरी कुठे आहे ?
मी हसतो...साल्यांना मी सापडणारच नाही...
कळणारच नाही त्यांना.
हीरो पाल झाला आहे पाल...
बुळबुळीत...पांढरी फटक...गारगार !

## १८. ट्रॅजेडी

पहा तुझ्या नायकाचा धीरोदात्त अंत
सुळापर्यंत चालत जाईल स्वाभावात संथ
दगडफेक झेलत असता मस्तक उंच करील
छिन्नभिन्न छातीवरती स्वस्तिक घट्ट धरील
पुण्यमूलक पाप खोविल तुऱ्यासारखे शिरीं
ओल्या जखमा कण्हेरींचे हार होतिल उरीं
तुझ्या तप्त चुंबनांचे भाळीं लावील टिळे
शवपेटीवरती शेवट डोळे होतिल खिळे
त्याचे शिल्पशक्ती ओठ अंतीं तसेच दिसतील
निरोप घेतेवेळीं हसत, तसे मंद हसतील

पिटामधले टाळ्या पिटोत, सज्जामधल्या रडोत
सभ्य भाळांवरती चुकून खोल आठ्या पडोत
तू अगदी स्तब्ध रहा, मान फिरवू नकोस
कथा संपत आल्यावेळीं गुपित मिरवू नकोस
रडतभेकत भेकड जातात पैल दर्यापार
एकादाच बादशहा असा बेदरकार !

## १९. समाधी

माझ्या समाधीवर, प्रेमा, तुझे मोकळे हासू वहा
धूप नको दीप नको कुरुंदावर एवढेच लिहा
' ...एक दिवस हसत आला, एक दिवस हसत गेला
असंख्यात ताऱ्यांपैकी ज्याचा होता त्याने नेला
याची देखील धाव होती काही नव्या श्रेयासाठी
मात्र याची वाट नव्हती कपाळींची खोल आठी...'

दवभरल्या माघामध्ये आंब्यावरती मोहर धरेल
एकाकीच कोकिळ कुणी पंचमाने रान भरेल
एकांतात भिजवून तेव्हा आण तुझा हसरा तुरा
—भिऊ नको—एकच क्षण धार चढेल त्याच्या सुरा !

## २०. फकीर

उचल गड्या हृदयाचे ओझे, चढव मनावर जोडा
क्षणभर झाली कासाविशि तरि तोंड तुझा तू खोडा
झाले गेले त्यावर टेकुन हात ऊठ रे वेड्या
उचलताच तू पहिले पाउल; तुटतिल अवघड बेड्या
सराईतली पंगत सरली; उरले मुठभर पोहे
बांध पुडी ती, आणि असू द्या चार कबीरी दोहे
कुंडलीतल्या मातबरांना चुकला नाही फेरा
त्यांतुन भाई, अपुल्या पायीं भंवरे सैरावैरा
अलख अपुला पंथ कफल्लक, गाव न त्याला ठावे
प्राक्तन करिते सक्त इशारा, फक्त चालते व्हावे
शेर असे तो पडाव होता, लंगर झाले साफ
उचल कटोरा, ना तर सद्‌गुरू करतिल रे इन्साफ
गोडधोड वा आंबटचिंबट ते या दुनियेसाठी
कफल्लकाची चिलम अफीमी इलम आपुल्या गाठीं !



55483

# २१. बाहूंत तू बांधू नको

भलत्या क्षणीं जागी पुन्हा झाली कशी स्मृतिसंहिता ?
झाली फिरून सुरू कशी शोकांत जी सरली कथा ?
जमणार जे नव्हते तुला उच्चार तो केलास का ?
वरदान देउन शापिले मी मानिता तुज देवता !
माझ्या जुन्या दुःखासवे होतोच झिंगत मी सुखें
झालीस का संजीवनी नच याचिता नच वांछिता ?
आशा कधी होती मला ? मी दान मागितले कधी ?
तारांविना वीणेवरी आला कसा स्वर छेडिता ?
टाळ्यांचिया गजरामधे स्वीकारली मी दूषणे
साऱ्या जगा जे ठाउके; येईल का नाकारता ?
शिंपू नको वणवा असा वैशाखिच्या वळवापरी
त्या वेदनावेदा कधी शोभेल का ही सांगता ?
केव्हाच तो माझ्या शिरीं फुटला घडा शुभलक्षणी
बाहूंत तू बांधू नको दाही दिशा जळ वाहता !

## २२. विषारी कट्यारी

विषारी कट्यारी जिव्हारीं जिवासी
लावून गेला कुठे तो प्रवासी ?

गळां आसवांची जरी माळ माझ्या
तोडून गेला कुठे तो मिजासी ?

कशी पूर्वजन्मीं ऋणी राहिले मी
जन्मास आले अशी गर्भदासी !

सुखांची शिदोरी सदाची तयाला
ताटातुटीची माझी मिरासी !

कुठे मैफली रंगवी राजबिंडा
झुराया इथे राहिले मी उदासी

माझ्या खुषीची खुशाली तया द्या
आहे म्हणावे सुखी स्वर्गवासीं !

## २३. हस्ताचे गाणे

अस्से बाई काळे ढग
काळोखाने भरले जग
भरून भरून यावे किती
छातीभऽर नाचे भिती
सरसर धारा आल्या तोच
मिटून गेली चातकचोच
भिजली माती थेंबोथेंबीं
वास भरला टिंबोटिंबीं
मनात माझ्या पडली वीज
दोन तुकडे झाली नीज
लोंढे आले आतबाहेर
वाहून गेले सासरमाहेर
रावजी आले घोड्यावरून
ऊन पडले अंगण भरून
सात रंग अमोर समोर
पापणीवरती मोरच मोर

# २४. दिवाणा

पैलतिरावर धूसर डोंगर पलीकडे मृगधारा
        त्या पिउन झिंगला वारा
ऐलतिरावर झिंगुन येता चुंफुन घेई गारा
        पी कमळदळातिल पारा !
काय नवल मग त्यात अगे तो वेडे वादळ झाला
        अन् खेळत झिम्मा आला
तीव्र नखांनी छेडि तनूवर दिडदा दिडदा बोला
        स्पर्शाने वाजवि झाला !
शेजीबाई मला सांगते सोडु नको गऽ तोला
        हा अवचित देइल झोला
पलिकडल्या मांडवात याने गोंधळ पुरता केला
        बेइमान आहे मेला !
माझ्या घरचा विंझण चिमणा आहे सौम्य शहाणा
        तो होतो बापुडवाणा
हाय हाय ! मी काय करू ग ! सुटतच नाहि उखाणा
        मज रुचतो तोच दिवाणा !

## २५. संकेत

सर्वांसाठी आणि सर्वदा
सदाफुलीचे अक्षय हासू
फक्त तुझ्यास्तव आणि तुझ्यास्तव
एकांतींचा एकच आसू
सर्वांसाठी आणि सर्वदा
अल्लड भाषण लाडिकवाणे
फक्त तुझ्यास्तव आणि तुझ्यास्तव
एकांतींचे अबोल गाणे
सर्वांसाठी सांज-सकाळीं
वेष-भूषणे जरा प्रसाधन
स्वप्नफुलांच्या आडोशाने
तुझ्याचसाठी अधुरे दर्शन
अभ्यागत अतिथींच्या ताटीं
घमघमणारे सुगरणवैभव
मात्र शिळ्या दहिभातामधला
एक घास... तो फक्त तुझ्यास्तव

## २६. सांभाळ

तूच त्याला सांभाळ बरे
तूच त्याला जपत रहा
झऱ्यासारखा हसत ठेव
दुखलेखुपले तूच पहा.
तुझे मन अधिक समर्थ
तुझी माया खूप विशाल
थकल्यावरती थोपट जरा
हलक्या हातीं शाल घाल
तुला देखील ठाऊक आहे
उल्हासानेच मलूल होतो
आता बाप झाला तरी
मुलांमध्ये मूल होतो
लहानपणापासून असा
कायमचाच लहान आहे
पावसाचे प्रेम त्याला
चांदण्याची तहान आहे
त्याचे हिशेब कच्चे खरे
त्याचे जग साधे सरळ,
त्याला मीही भली वाटले
त्याच्या रक्तात नाही गरळ
एकदा आणि एकदाच फक्त...
त्याचे त्याला कळले नसेल,

काही तरीच बोलून गेला...

...मलाच भास झाला असेल.
तोच तेवढा माझा क्षण
तुझा सगळा दीर्घ दिवस
माझ्यासाठी काही नको
मला प्रत्येक रात्र अवस.

आता काही बोलत नाही
तूही काही बोलू नकोस
हेलावणाऱ्या दोन मनांत
त्याचे मन तोलू नकोस

त्याचे डोळे निर्मळ नितळ
त्याचे शब्द जाईजुई
त्याचे निःश्वास आपले श्वास
त्याची स्वप्ने माझी भुई

आता इथून जाईन म्हणते
माझे पाय माझे प्राण
दहा दिशा बारा वाटा
एक शपथ माझे त्राण

तुझा त्याचा एक तारा
एक नदी एक होडी
किती किती साजून दिसते
तुझी त्याची एक जोडी

तूच त्याचा सांभाळ कर
तूच त्याला जपत रहा
झऱ्यासारखा हसत ठेव
दुखलेखुपले तूच पहा.

# २७. सायली

माझी रुसली सायली
आज नव्या भरा आली
स्पर्श पहिल्या मेघाचा
होता कशी रसावली

माय मातीला लुचून
आधी पानपान भरे
आता अंगोपांगांवर
आले सुगंधाचे तुरे

मांडवाच्या छतापाशी
शुभ्र रेशमाची छत्री
जाई खालून हिरवी
धरा-आभाळाची पुत्री

नका म्हणू रे मोठ्याने
कुणी सावनी लावणी
आता कुठे हिच्या उरीं
झाली मृगाची पेरणी !

## २८. पराभूत

पराभूताची राणी असते सर्वांत शहाणी,
तिने पूर्वीच पाहिलेले असतात त्याचे पराभव,
तिच्या प्रत्येक स्वप्नात त्याचे मरण
हातात अदृश्य मानदंड, उंची मोजणारा,
त्याच्या दुर्भेद्य उराची खोली मापताना मोडणारा.

तिच्या डोळयांत असते चिक्कट चिप्पडपाणी
पण तिचा खरा डोळा असतो तिसराच
पंखांवरचे पंखांहून मोठे कलंक पाहणारा
तिच्या कानांना ऐकू येतात अनाहत धिक्कार
छातीवर डोके ठेवले तरी समजत नाहीत त्याची स्पंदने.

ती आठवते त्याचे प्रमाथी प्रमाद
ती आठवते त्याच्या मध्यरात्रीच्या येरझारा
तिच्या फोपशा स्वप्नांना पडलेल्या खिंडारातून
तिने पाहिलेला असतो त्याचा घोडा अडताना
तिलाच केवळ ठाऊक असते त्याचे नेमके वर्म.

पराभूताचा मातृमुखी युवराज
घेतो असहाय प्रेताचे नागडे दर्शन
पुटपुटतो स्वतःशी ... तरीच आम्ही असे
तरीच आम्ही असे ...

## २९. एक

अरळतरळ लाटा
एक विलयकात्री
सरळ सरळ वाटा
एक बिगरखात्री
नितळ निवळ पाणी
एक मगरपात्री
उजळ उथळ घटका
एक प्रलयरात्री !

# ३०. व्यभिचार

शब्द ओशट शामळू
जरीटोपी घातलेले
*अर्थ धुवट गवाळे*
[illegible] घेतलेले

*पंक्ती खुजट खुरट्या*
त्यांचा मुरका माफक
खूण पुसट दुबळी
सूर सपाट सपक...

...जळो चिवट सौभाग्य
वरवर उपचार
बरा जिवट दुर्घट
जातिवंत व्यभिचार

# ३१. एकटा

असेही होते की
नादांची विचित्रे
कानांवर पडतात
पण ऐकू येत नाहीत.
काला करणारी
भुतावळ शाळकरी
माळकरी भिक्षेचा
तारस्वर आक्रोश.
क्रोशभर किंचाळतात
साथीदार भोंगे.
सोंगे विक्रेत्यांची
तणावून ओरडणारी.
रडणारी भुकेली
अकेली अर्भके
बेबे आण्यांच्या
गाण्यांच्या किंकाळ्या.
काळ्या धुरासकट
आक्रस्ताळी शिटी.
पिसाट चक्रांचे
एकसुरी मंत्र.
यंत्रशीर शहरांचे
नित्याचे कोलाहल.
जिंदाबाद मुर्दाबाद
अप अप डाउन डाउन.

संकुल समुद्राची
हलकल्लोळ भरती.
वरती अचानक
अपघाती चीत्कार.
सत्कार वाजंत्री
गल्लीभर गलका.
हलका सिनेमा
नाक्याच्या मोक्यावर.
गिल्लास कपांचा
बेदरकार किणकिणाट
चौफेर चहाबाजांचा
चावट खळखळाट.

चित्रमय नगरीतल्या
नादांची विचित्रे
घोटात पिईलही
एकादा अगस्ती.

एकाकीपणाचे
लागल्यावर डोहाळे
सोहाळे होतात
तेच असतात बिकट.
विकट वैराणातल्या
असीम नीरवतेतच
उफाळतो कोलाहल
गाभ्याच्या गाभ्यात.

पान हालत नाही
पक्षी बोलत नाही
गाय हंबरत नाही
माणूस बोलत नाही
अशा क्षणी होतात
मनाचे भूकंप.
भूतकाळाच्या
काळोख्या डोहावरून
उसळतात एकाएक
प्रळयंकर लाटा.
उठतात आरोळ्या...
न फेडल्या ऋणांच्या
संतप्त शापांच्या
निगूढ पापांच्या
ईर्ष्यांच्या, भयांच्या
अटळ पराजयांच्या
अभुक्त आशांच्या
अनुक्त इच्छांच्या
गिरगिरत्या भिरभिरत्या
अहोरात्र आरोळ्या.
विजनातला कोलाहल
हलाहल पाजणारा !

नामर्द जिजीविषा
विषाला डरणारी
आपसूक परतते

सवयीच्या संमर्दात.

एकाकी आत्म्याची
ओवंड टाळण्यासाठी
बरा पडतो बाबा
गर्दीतला एकान्त
रामबाण अफूचा.

## ३२. व्रत

गढूळ वासनांच्या पुरांच्या लोंढ्यातून
अभावित रुजतात बियाणी
गढूळ कामनांच्या मिठीतून सुटताना
ओरडतात अयाचित प्रयाणीं
येताना नाखुषी जाताना नाखुषी
चालताना इच्छेची पराणी
अस्तिनास्तीचा निरालंब हिंदोळा
दिसे ना दोरीही पुराणी

एक अपवाद : जे हर्षोत्फुल्ल येतात ते
आगंतुक प्रभूचे प्रेषित.
दुसरा अपवाद : जे हुतात्मे हुकुमाने
बोलावतात मरणाला वांछित

कासया कासया खेळाची असोशी !
कंटाळा येईना कसा ?
अनादि अनंता ! कोणा फळासाठी
घेसी हा मायेचा वसा !

## ३३. गुरु

माझा मित्र शिल्पकार
आहे आपला असातसा
गणपतीच करीत राहीन
असा घेतला नाहीन वसा
करतो काय एखाद वेळी
तेढीमेढी घेतो तार
इथे तिथे थापून देतो
थोडी माती खडे चार
आणि म्हणतो—
बैल पहा...
...बैल म्हणजे...बैलपणा !
सगळा बैल रवंथ करून
ठेवल्या फक्त जन्मखुणा ! !

तसाच माझा दुसरा मित्र
आहे आपला वेडा माळी
त्याच्यापाशी जमीन नाही
आणि नसणार कधी काळीं
करतो काय,
ज्येष्ठामधे
ऊनसावली पाहात बसतो
इथे तिथे डोळ्यांनीच
मापे घेतो वाफे करतो
आणि मग वाजवून टाळी

म्हणतो ' असे—तसे—बास्!'
वृक्ष नाही वल्ली नाही
बागशाही बघतो खास !

तसाच आपला आमचा तो
राजरस्ता ओलांडताना
घुम्या घुम्या घुमटामधे
घेत असतो अबोल ताना
गाणे जन्मा येण्यापूर्वी
त्याला सूर लख्ख दिसतो
इथे तिथे पीळ देत
गोफ विणीत हसत असतो
गातो—

म्हणजे गात नाही
मुका सूर, मुका ताल
म्हणून तर त्याचे गाणे
जन्मा आले नव्हते काल !!

अरूपाला रूप करीन
असा नाही ह्यांना ध्यास
कल्पनेचे कल्पनापण
तेवढे हवे आहे त्यांस
भूस नको पत्ती नको
मायक्रोफोन नको त्यांना
आपल्या मनात अगदी आत
करतात बैल-बाग-ताना

हेच माझे सख्खे सगे
हेच बरे माझे गुरू
कारण असे–
–यांची कळा
अंतापासून होते सुरू!!

## ३४. एका कुमाराची कहाणी

सकाळच्या उन्हासरसे एकदा याने काय केले
दिसेल त्या आकाराला सोन्याचे हात दिले
टिंबाटिंबामधे जसे बिंब आपले भरून ठेवले
वडीलधाऱ्या वडांचेही माथे जरा खाली लवले
तेवढ्यामधे कोणी तरी कौतुकाची टाळी दिली...
तशी हा सावध झाला,
आपली आपण हाक ऐकून दूरदूर निघून गेला.

सूर्यसन्मुख सूर्यफूल एकटक तप करते
धरतीवरती पाय रोवून आकाशाचा जप करते
तसा तोही इमानदार उग्र एकाग्र झाला
तेव्हा म्हणे कोणी याला आदराचा मुजरा केला...
तशी हा जो तडक उठला,
मृगजळ पिण्यासाठी रानोमाळ धावत सुटला.

खजुरीच्या बनामधे संध्याकाळची सावली झाला
तेव्हा याच्या देहावरून लमाणांचा तांडा गेला
मग म्हणे कोणी तरी याच्यासाठी हाय म्हटले...
तशी याने काय केले,
कोशासारखे वेढून घेतले याने कबीराचे शेले.

मीरेच्या मंदिरात मारवा होऊन घुमत राहिला
कोणी म्हणतात निर्गुणाच्या डोहाचाही तळ पाहिला...
एवढ्यामधे काय घडले,
महाकालमंदिरात सनातन डमरू झडले.

कण्यामधल्या मण्यांमधून

मल्हाराची नागिण उठली

चंद्राच्या तळ्यामधे ओंकाराची लाट फुटली

तेव्हा म्हणे जरा कुठे कंठामधली तहान मिटली...

आता तसा कुशल आहे, स्वप्नामधे दचकून उठे

म्हणे माझा सप्तवर्ण शामकर्ण घोडा कुठे !

## ३५. मायकेलँजेलोपनिषद्

संगमरवरातून संगमरवर वजा केल्यावर
संगमरवर उरला पाहिजे.
जो संगमरवरातून हस्तिदंत ठेवीन म्हणेल
तो अपकीर्ती नामक नरकात जाईल.
हाच न्याय
संगमरवरातून सोने, चांदी, पंचरसी काढण्याविषयी.

ज्यांच्या पापण्यांवर सोन्याची टोपणे असतात
त्यांना संगमरवरातला संगमरवर दिसत नाही.
ज्यांच्या हृदयांचे ठोके
नागरिकांच्या टाळ्यांचे प्रतिताल असतात
ते संगमरवराला दुखवतात.
पवित्र शिलांवर बलात्कार करणाऱ्यांना
शाश्वत अंधार नामक नरक नेमलेला आहे.

एका संगमरवरात एकच पुतळा असतो, असू शकतो.
प्रत्येक शिळेचा पुत्र स्वतंत्र आहे.
पुतळ्याला पुनर्जन्माचा शाप नाही,
मात्र त्याचा जन्म व्हायला हवा.
हे श्वेतकेतो ! तू नचिकेताच्या आईला होत नाहीस
आणि नचिकेता तुझ्या आईला
इथे तोच दृष्टान्त आहे.

शिल्पकाराच्या प्रज्ञेला चक्षू फुटतात
तेव्हा त्याचे चक्षू छिन्नी होतात.

माझ्या अन्तेवासी शिल्पकारांनो,
संगमरवरातला संगमरवर पूर्ण दिसल्यावर
पापण्यांच्या केसांनी माती झाडा.
मग निष्ठुर छिन्नीच्या मेजक्या घावांनी
ऋण-संगमरवर दूर करून
घन-संगमरवर शिल्लक ठेवा.
मातेच्या उदरात
विकसित होतो साङ्ग समग्र गर्भ
हाच न्याय
संगमरवरातून जन्म घेणाऱ्या संगमरवराविषयी.
माझ्या अन्तेवासी शिल्पकारांनो
तुम्ही असता केवळ अनुभवी सुइणी.
पहिलटकरणींचे अवघडलेले प्रसव तुम्ही घडवा.
पुतळे आधीच घडलेले आहेत.

प्रजापती धूर्त आहे.
पंचकोशांच्या वंचनेने तो आम्हांला आंधळे करतो.
हे सूर्या, तुझ्या वीर्याने
तू आमच्या डोळ्यांतील बाहुल्या फळव.
अंध तमातून आविर्भूत झालेले ते जुळे अश्विनीकुमार
टरफलांतल्या टरफलात लपलेले
चैतन्याचे कळे विकसित करोत.
पहा कसे हे संगमरवर. . .
काही स्त्रिया, काही नर
सर्प, मत्स्य, गरुड, वानर,
काही स्थिती, काही गती

काही स्वप्ने, काही कृती
काही वादळ, झुळुक काही
काही केवळ काहीबाही
काही एकटे, काही समूह
काही केवळ चक्रव्यूह
काही असतात वांझच मुळी
तर काहींना जुळी तिळी
काही कृश, काही पुष्ट
काही संत, काही दुष्ट
कोणी हसतात कोणी रुसतात
काहींना तर चेहरेच नसतात
काही अस्थी, काही वक्ष
काही दीन, काही दक्ष
कोणी केवळ कोमल अरुण
कोणी न्यायनिष्ठुर वरुण
पक्षी, पशू
वृद्ध, शिशू
यक्ष, किन्नर
राक्षस, ईश्वर...

हे भविष्यन् अभविष्यन् अन्तेवासींनो
अलगद बोटांच्या हळुवार हातांनी
बाळे हळूच काढून घ्या.
मात्र आधी
संगमरवरातून आरपार पाहून घ्या.
कारण

संगमरवरातून संगमरवर दूर केल्यावर
संगमरवर जन्माला घालील
तो अमृतस्य पुत्राः पदवीला पोचेल.
हाच आदेश, हाच उपदेश, हेच उपनिषद्.

## ३६. नुकत्याच उगवलेल्या कविमित्रास

भाग्यरेषेच्या मुळाशी नख लावीत
किती वेळ ठेवशील ही वळलेली मूठ
प्राथमिक सत्यांचे पाढे पिसताना
कितीदा आत्म्याला म्हणशील तू झूट
खरड ना एकदा ती मेंदूची मिसरूड
विंचर की आता त्या संज्ञा
तारुण्यपीटिकांचे बेंडबाजे झाल्यावर
येऊ दे वयामधे प्रज्ञा

सिंगल गुलाबी नेहमीचा घेताना
कशाला घालतोस टिंगलभर अफू
पुरे की आता ही पाठखाजवणी
एकमेकांच्या पँटींना रफू
तुला पाहिल्यावर पहिल्यांदा दचकलो
म्हटले हा माझाच का अवतार
सोडमुंजीतला माझाच फोटो हा
तोच हा कैफाचा उच्चार

नाहीस तू विटलेला खरोखर अजून
बहाणा आपल्याशी कशाला
मोजक्याच मज्जांना पिळवटून टाकू नकोस
स्वप्नेही घेत जा उशाला
स्वच्छ धू बघू एकदा ते प्राण
मनावर मारून ये पाणी

ऊन ऊन श्वासांचा खाऊन घे घास
मग सुचतील रे गाणी

तलग्यांच्या गलग्याने जाग आली तरी
तेवढ्याने फुटते का तांबडे
त्याचे जन्मदाते वेगळेच असतात रे
फुक्कटचे अक्कडबाज कोंबडे !

## ३७. मोक्ष

कुणी लावले कुणास ठाउक
वेदान्ताचे लचांड पाठीं
कुणी भक्तिची चावट बोथी
दिली कोंबुनी अमुच्या ओठीं !

कुणी खुपसली पद्यपंक्तिची
तरफ दयाळा ! दुबळया हातीं
शंख, तुतारी, खड्ग, सुकाणू,
झेंडा धेंडांकरवी देती !

ध्येय देव निज धर्माखातर
कातर लावति कुणी जिभेला
कुणी म्हणाले अर्थ नको परि
हवा सभेला प्रसाद-भेला !

कुणी टोचती अंकुश, तैसे
तीर मारती, ढेकुळ कोणी
कुणी थापती शेण, लादती
अमुच्या पाठीं अपुल्या गोणी !

अखेर थकले सर्व शहाणे
उरलो आता गीतापुरता
पिळवटलेला एक सूर तरि
जन्मा यावा मरतामरता !

## ३८. आबाद

अजून सगळे नाटक आहे
डोळयांपुढून डोळ्यांवरून
अजून नाही कुणा काही
आपादमस्तक टाकीत चिरून

कुठे काही सलते, तेव्हा
खाजवाखाजव वरच्यावरून
कोण करतो झगझग साली
मर्मापर्यंत आत शिरून

जखम झाली तरी आपले
पाणी फक्त गालावरून
फार फार तर ओठापाशी
कंठापाशी जाते जिरून

कोणी उगाच मरते तेव्हा
आरडाओरड होते दुरून
झिंदाबाद मुर्दाबाद
सर्व आबाद होते फिरून

## ३९. पंधरा ऑगस्ट

फिरत राहते यंत्रारूढ जडमूढ धरती
—आजदेखील उजाडलेच लाल किल्ल्यावरती
गर्दन छाटली होती तरी झेंडा उंच गेलाच
छाती फाटली होती तरी आम्ही घोष केलाच

उजाडताच मास्तरांनी केले ढोरवळण
रेडिओने दळून टाकले सालाबादचे दळण
शेटजींनी काल धुतली गांधीटोपी मळकट
आज म्हटले—नेहरूंचे हात करा बळकट

सनातन संस्कृती ! वय वाढले आज
वाढत्या वयात तशी थोडी कमीच होते लाज
थोडे अवसान आणले तर छाती फुगते पोचट
अन्नब्रह्मासाठी होतात देवदेखील लोचट

तोंडपाटील चावडीवरती जेव्हा ढोल झडले
तेव्हा म्हणतात...आघाडीवर पहिले बर्फ पडले !

## ४०. मानवाच्या दुःखाचे मूळ

अच्चाने एक सूट घातला
बच्चाने एक सूट घातला
सच्चाने एक सूट घातला
अच्चाने बूट घातले
बच्चाने बूट घातले
सच्चाने बूट घातले
आणि पुढे असेच खूप
चश्मा बिश्मा, सिग्रेट बिग्रेट,
घड्याळ बिड्याळ, बॅग बिग,
वगैरे इत्यादी.
ते गेले परिसंवादाला

अच्चाने एक प्रश्न मांडला
बच्चाने एक प्रश्न मांडला
सच्चा काय म्हणून सोडील ?
अच्चाने अवतरण दिले
बच्चाने अवतरण दिले
सच्चाने अवतरण दिले
आणि पुढे असेच खूप
मार्क्स बीर्क्स गांधी बिंधी
लॉर्का फिर्का शॉऽ बीऽऽ
वगैरे इत्यादी
हा, तो, तो, हा.

अच्चा म्हणाला मला नाही पटत
बच्चा म्हणाला मला नाही पटत
सच्चा म्हणाला मला नाही पटत
अच्चा म्हणाला आय मीन
बच्चा म्हणाला आय मीन
सच्चा म्हणाला आय देखील मीन
आणि पुढे असेच खूप
आय सी यू सी
यू शी इट सीज
वगैरे इत्यादी.
व्ला व्ला व्ला व्ला.

अच्चाने बच्चाला ठणकावले
बच्चाने सच्चाला ठणकावले
सच्चाने दोघांना ठणकावले
अच्चाने बच्चाला काफ्कावले
बच्चाने सच्चाला रसेलले
सच्चाने उपनिषदून काढले
आणि पुढे असेच खूप
गीता बीता बायबल बियबल
याने त्याला सार्त्र दिला
त्याने याला कामून काढले
वगैरे इत्यादी.
सर्वांचीच कोटाकोटी.

अच्चाला प्रकाश दिसला
बच्चाला प्रकाश दिसला

सच्चालाही प्रकाश दिसला
अच्चा म्हणाला अहम् ग्रेट
बच्चा म्हणाला आवाम् ग्रेट
सच्चा म्हणाला वयम् ग्रेट
आणि पुढे असेच खूप
अहं आवाम् वयम् प्रथमा
अहं आवाम् वयम् द्वितीया
अहं आवाम् वयम् तृतीया
वगैरे इत्यादी.
लक्षिमा, कोटिमा, परार्धिमा...एटसेट्रा...

## ४१. बाळमूठ वज्रघाव

जेव्हा सायंप्रार्थनेचे विरळ विरळ झाले सूर
शीड-तुटके अजिंक्य जहाज जेव्हा गेले दूर दूर
तेव्हापासून राजवाड्यात गर्दी तरी व्हावी किती
राजघाट बुडला तेथे आश्रमांची काय स्थिती !

पंख तुटले पाखरांचे बुजून गेल्या निळ्या वाटा
हिरवळीवर विहरताना कुणा सलला नाही काटा
काळी काळझोप आली पांढऱ्या शुभ्र कोशामधे
गाणी भिंगुळवाणी झाली पगाऱ्यांच्या घोषामधे

पूर्वी मुंग्या माणसे झाल्या, आता मुंग्या झाली माणसे
ज्याने त्याने बीज खाता कुठून यावी नवी कणसे
मुळमुळु वहात होते मुळामधले निळे रक्त
किती वर्षे भरती नाही ओशाळवाणी ओहटी फक्त

तोच वाजे भैरवशंख तुतारीची तीव्र हाक...
वादळ झाले, वणवा आला, ब्रह्मपुत्रा बेचिराख
झोप गेली ज्याची त्याची, संचिताचा चक्काचूर
उगवतीला सूर्यावरती लालपिवळा गेला धूर

आभाळात धरणीकंप ! हादरून गेले वतनी घर
तावदाने तडकुन गेली, छप्पर पडले डोक्यावर
तोच कुठून स्वर आला... अजून उशीर नाही झाला
अशुद्धाचा चिखल करून पूर्वेकडे भिंत घाला

कोणाचा हा क्षीण स्वर कानांवरती येतो आहे ?
तोफाबंदुकांहून उंच आज्ञा कोण देतो आहे ?

प्रत्येकाच्या भात्यामधे कोणी भरला गरम श्वास ?
निखळलेल्या चक्रांमधे याचा हात झाला आंस !

चंद्रमौळी घरांवरती ज्यांनी फेकली जळती चूड
त्यांना आता क्षमा नाही, त्यांना उत्तर ‘ सूड सूड ’
जितकी माणसे तितके वीर, कोण घेईल मागे पाय ?
स्वातंत्र्याच्या आकांक्षेला कोणी रोखू शकेल काय ?

सह्याद्रीच्या वादळवाऱ्या ! पैल जाऊन सांग खबर—
थंडगार बर्फामधे ज्यांना हवी असेल कबर
तेवढी भुते पुढे या, बाकी सारे चले जाव !
कोपर-ढोपर संगिन इथे, बाळमूठ वज्रघाव ! !

## ४२. या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान
दिसला त्याला तपीं बैसला दुरून गिरि हिमवान्
गंगेच्या अंगावर दिसला झुलता हिरवा साज
यमुनातीरीं संगमरवरी चंद्रमण्यांचा ताज
पंचनद्यांची अक्षय थाळी वहार झेलमवरचे
गगनमांडवा खांब रोवले माड दक्षिणेघरचे
परी न दिसले त्याला इथले जिते लोहपाषाण
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

चहामळयांचा तेलनळयांचा वास हुंगिला कोठे
गहुलोंब्यांच्या ओल्या हिरव्या श्वासांचे सुख मोठे
असेल आली फुलबागांची चाहुल त्याला मंद
चंदनचर्चित मूर्तीचा वा असेल आला गंध
तया न झाले जगदंबेच्या धूपाचे परि भान
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

लाटांवरल्या वाटा चुकले नावाड्याचे गीत
त्यात तयाला असेल कळली कंथाघरची प्रीत
नभात भरली मंजुळ मुरली असेल शिरली कानीं
तये ऐकिली विव्हळ वीणा घायल कोयलवाणी
नसे ऐकले त्याने इथले हरहर भैरवगान
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

वाऱ्यावरती वहात गेला अंगाईचा स्पर्श
मतिमंदाला अंदाजाने कळे गुलाबी हर्ष

मदनतरूवर फुलवित मोहर पवन चले पुरवैया
दक्षिण दर्या इथे आंथरी रेतीची सुखशय्या
झुंजारांच्या भुजांत लपले कळे न त्यास तुफान
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

शेतमळ्यांतिल दिसले असतिल किसान त्या कष्टाळू
त्याला दिसल्या जात्यांवरल्या दळणाऱ्या कुणि साळू
घामाने भिजतात सावल्या गिरण्यांतुन खपताना
मापुनमेजुन जरा वाकल्या मेजांवरल्या माना
परि सर्वांच्या नसानसांतुन धगधगतो अभिमान
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

जाट-शीख-रजपूत कुळांची उगा न जगतीं ख्याती
कळिकाळाला कळली आहे मर्द मराठी छाती
काय घेतले तृण कापाया विळे कोयते हातीं ?
भाला वरची पिकवी घरची कृष्णातिरची माती
विळे कोयते करतिल येथे शत्रूचे शिरकाण
या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्तान

## ४३. विनवणी

आज उत्सव नको. उत्सव उद्या करा.
सारे यायला हवेत. पुढला मुहूर्त धरा.

पोटात वंगण नाही. चाक अडले आहे.
अंगात तकवा नाही. काम पडले आहे.
चुली थंड आहेत. आत जळते आहे.
महारवाड्यामधले छप्पर गळते आहे.
मार खाल्ला त्याची कळ उठते अजून.
वळ ओले ओले गेले नाहीत बुजून.
अजून आमच्या चिंध्या धुवून झाल्याच नाहीत.
( पाठवठ्यावर बाया आज गेल्याच नाहीत )
रथ ओढणार कसा ? आज चालवत नाही.
घोष करणार कसा ? जय बोलवत नाही.

उत्सव झालाच पाहिजे. उत्सव उद्या ठेवा.
उद्या उजाडल्यावर भक्कम घ्यावी सेवा.

## ४४. दुष्काळ

जेव्हा देशात दुष्काळ पडतो.
तेव्हा चढतो सार्वजनिक हौदातल्या अश्रूंना महापूर
महापूर वाहतात पऱ्यांच्या पऱ्हाळी
उन्हाळी व्याख्यानमाला
पेरतात विद्वानांची संकरित बियाणी
पिकतात अमाप वायफळांचे मळे,
वळतात चऱ्हाटे, गुऱ्हाळे एरंडांची

उलटसुलट आकडयांच्या जबरदस्त जंगलात
मस्त नाचतात कागदी सरकारी घोडे
तज्ज्ञांच्या घडयाळांचा जमत नाही मेळ
खेळ रंगतो टक्क्यांचा
फंड फुगवण्याचेही वेगवेगळे फड असतात
चीफ एक्झिक्युटिव्ह करतो स्वखुशीने पगार कपात
भागवतो फक्त साडेपाच हजारात सहाऐवजी
मलबारहिलवर आठवडयातून एकदा चुलीला रजा
( मजा त्या दिवशी अलीशान हॉटेलात )
माईसाहेब करतात हळदीकुंकू रद्द
ताईसाहेब करतात जनतेसाठी डायटिंग

सर्वांनी सर्वांसाठी खूप खूप त्याग केल्यावर
एक दिवस येतो मुसळधार पाऊस...
गढूळ लाल पाणलोटाबरोबर

वाहत जातात कागदाचे घोडे, फंडाच्या पात्रात्या
आटतात नळ अचानक करुणेचे

आता वाट पहायची
पुढच्या दुर्गादेवीच्या दुष्काळाची !

## ४५. कंत्राट

चुन्याच्या दोनशे आठ कांबींचे सांगाडे
ताणलेल्या प्लास्टिकची इलॅस्टिक भिंताडे
वरून खाली खालून वर लालनिळया नळया
काचेच्या फायवरच्या फायरप्रुफ जाळया

जनरेटर बिनरेटर तळघरात सामावून
त्याच्यावर मशीनरूम... हेडॉफिस... गोडाऊन ..
सेन्सेटिव्ह मॅजिक आय, रडार आणि सर्व मीटर्स,
एक भट्टी, दोन भाते, छोटेछोटे गुप्त हीटर्स,

उकळणारा रक्तरस...पंपबिंप फुटकळ काम !
सुक्षम आणि टाइमशीर सांधेबिंधे हवेत जाम
एवढे काम करून टाका, तुमची रेप्युटेशन किती
आभाळाचे प्लॉट पाडलेत, या कामाची काय भिती
एवढे कंत्राट घेऊन टाका, मेहनतीचे काय मोठे !
बिल्डिंग उभी राहताक्षणी धनी येईल, जाईल कुठे !

## ४६. केनेडी

विश्वचिंतेचा भार बेदरकार भाळावर झुकलेला
निडर भुवयांखाली नवा अरुणोदय (चुकलेला)
स्मिताच्या फुलोऱ्यात आश्वास सुगंध सुटलेला
उरात शांततेस्तव एक ॲटम फुटलेला. . . .

ऊनसावलीचे जुळत आलेले स्वप्न जपणारा
सुवर्णगंगा सगरपुत्रांपर्यंत नेताना खपणारा
सदासिद्ध वचनबद्ध युयुत्सु तीर्थंकर
संकरशुभंकर हलाहल पिणारा शंकर . . . .

फुस्! शिस् गोळी एक लुटते आत्मबळ वगैरे!
धुरा कोसळते, धरेवरचे सगळेच अधुरे !!
काळ म्हणजे एकदिक् रॉकेट, अंध महावेग
धूमपुच्छाने सहज पुसून टाकतो प्रकाशरेघ

होते तसेच असतात सूर्य चंद्र विश्वाधार
चिमण्या आकाशात मात्र होतो ध्रुवांधार !

## ४७. खोपट

औरस चौरस खोपट माझे
अंगणरिंगण दुडकी धाव
इटुकल्यामिटुकल्या अस्तित्वाला
दप्तरकिमती आहे नाव
तरी हिमालयविंध्यस्मरणें
वारुळ वाढे पर्वतपाडे
बत्तिस इंची छातुकलीतच
किती ऋचा अन् किती पवाडे
भिंतीच्या भोकातुन बघतो
कामरूप मी काश्मिरकशिदा
जमुनागंगा भिडती अंगा
मलयज छेडी दिडदा दिडदा
ताम्हणतान्हे चिमणे पाणी
वंगरंगली त्यातच कमले
ईनमीन भूछत्राखाली
राजस्थानी गुजरी इमले
दीडवितीची मंडुकसंदुक
आत अजण्ठा-सांची साठा
डुगडुगणाऱ्या कण्यात शिरतो
कधी अचानक मावळताठा
कधि मानेचे उचलुन गोपुर
बघत राहतो दक्षिणवेला
सागरनाते सांगत असतो
अभिमानाने मी थेंबुकला

## ४८. किती सहज

किती सहज मणक्यामधले फुटून जातात मणी
किती सहज रक्तामधली मळली जाते कणी
सिंहासन दुरून कोठे दिसत असते — नसते
नाठाळांच्या ताठ माना झुकतात एका क्षणीं

किती सहज ठिसूळ होते अभिमानाची माती
नाणेबाजारातली तेवढी पक्की ठरतात नाती
त्यागदेखील मागत असतो कडकडून टाळी
उच्च उदात्तांचे फासे लोभियांच्या हातीं

खुर्चीवरचे बेरकी हासू आपल्या बाजूस वळते
तेव्हा घट्ट मठ्ठालाही पुढले गणित कळते
आतल्याआत पटापट हावरे हिशोब होतात
आत्म्याचीही किंमत कशी हातोहात मिळते

दुर्मिळ झाली कौटिल्याची चंद्रमौळी कुटी
गणिताचे टिळक मास्तर गेले वजावटी
किती सहज नवे मानव जन्मा आले आहेत
तीन ताड पूर्वजांचे पुत्र तीन फुटी !

## ४९. कॉम्रेड्स

कॉम्रेड्स, तुम्ही काळोखाचे पहाड फोडताहात
उरीं फुटताहात तुम्ही कॉम्रेड्स
भुत्याच्या पलित्यासारखे तुमचे ढणढण आयुष्य
तुमचे अस्तित्व एक ताणलेले धनुष्य
मी मानतो तुमची दुर्दम्य विजिगीषा
पण मी नाही चालू शकत तुमच्या राखाडी रांगेत
मी नाही पेलू शकत हा तुमचा हातोडा
वीट येतो तुमच्या एकमाप गणवेषाचा
नको मला मेंदूवरती तुमची ढगळ टोपी
खिळेदार बुटांच्या पायांमधल्या वेड्या
तुमच्या तुम्हांलाच लखलाभ असोत कॉम्रेड्स !

मी नाकारत नाही माझा दैवदत्त बोजा
मी नाही तटस्थ वड उकळत्या नदीकाठचा
नांगरचक्रधारी रामकृष्ण माझ्याही देव्हाऱ्यात आहेत
चीड येते मलाही या उमट काळोखाची
पण कॉम्रेड्स, मला नाही व्हायचं भरती या फौजेत
कॉम्रेड्स, तुमचा चंद्र हरवला आहे
तुम्ही नाहीत हुंगलेली अनंताची फुले
मी सांगतो तुम्हांला काही महान सत्ये
आकाश निळे असते. डोंगर निळे असतात.
धरती हिरवी असते. पहाटे फुले फुलतात.
समुद्र मरणासारखा मोहक असतो. माणूस कॉम्प्लेक्स.
एकएक प्रमदा असते जिवंत डायलेक्टिक्स !

कॉम्रेड्स, आज मी एक थीसिस मांडू का ?
काळोखाला भिणारे दोन वाटांनी पळू शकतात
पहिली वाट सोपी; तुपट सुखाच्या बुळबुळीत उतरणीची
दुसरी प्रथम अवघड...पुढे सोइस्कर सरावाची
स्वतःवर थुंकण्याची जगावर भुंकण्याची
या वाटा माझ्या नाहीत...चंडोलांच्या गांडुळांच्या.
तुमच्या वाटेने, पण मी आपला एकटा येईन
आपण काळ्या पहाडावर पहार चालवू या
आपण सुस्त अजगराला गदागदा हालवू या
कबूल ! दारुगोळा सदैव कोरडा ठेवू या
फाशीच्या तक्त्याला वेडावून दाखवू या
तुमच्यासारखी उघडी करीन मी माझी निधडी छाती
वेळ आलीच तर फायरिंग स्क्वाडसमोर

तुम्ही माझ्यासाठी काय कराल कॉम्रेड्स ?
दोन क्रांतिगीतांनंतर एकाद दुसरी लावणी म्हणाल ?
संगिनीला धार लावताना संगीत शीळ घालाल ?
उन्हामध्ये सात डोंगर ओलांडून गेल्यावर
चांदण्याच्या तलावात एकदा तरी सूर माराल ?
पावसाळी संध्याकाळीं कधी तरी सतार ऐकाल ?
कॉम्रेड्स ! तुम्ही माझ्यासाठी एकदा मेघदूत वाचाल ?
आषाढाच्या पहिल्या दिवशी तुम्ही पावसामध्ये नाचाल ?
कधी तरी एवढेच करा.... चिलखत दूर ठेवा जरा
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्यांचा एकदा तरी फेर धरा
प्लीज, कॉम्रेड्स, प्लीज....जरा माझ्यावरती विश्वास ठेवा
माणसावरती विश्वास ठेवा....

## ५०. जंगल

कोरे करकरीत कॉंक्रीटचे जंगल
उंची विषवृक्षांचे,
एअरकंडिशन्ड गुहांमधील गुलगुलीत श्वापदांचे
आयत्या बिळावरील थुलथुलीत नागांचे
रिटायर झालेल्या मोहरमच्या वाघांचे
वजनदार अजगरांचे, कावेबाज कोल्ह्यांचे
कातडी पांघरणाऱ्या सिंथेटिक सिंहांचे
एक आलीशान जंगल....

गगनचुंबी झाडांवरची भली थोरली घरटी
नायलॉनच्या परांची, इंपोर्टेड गवताची
बेभान बुलबुलांची, मस्तवाल मैनांची
दुपारीच लाभणाऱ्या परभृत उर्वशांची
उद्याच्या सूर्याला भिणाऱ्या घुबडांची
मोहाच्या झाडावरील साहसी साळुंक्यांची
काळ्या बाजारातून सायंकाळी येणाऱ्या
पांढऱ्या फेक कावळ्यांची....

हे कॉंक्रीटचे घनदाट जंगल
शाश्वत अंधाराचे अफीमी डिसकॉथेक !
येथील प्राणिमात्रांना अंधत्वाचा शाप आहे
अधिक चरबीमुळे डोळे बंद होतात
परावर्तित सोन्याच्या तेजाने अंध होतात
मग काही इलाज नसतो.

सारी पिले, त्यांची पिले, पिलांची पिले
एक दीर्घ दीर्घ आंधळयांची माळ....

प्रत्येक विषवृक्षाच्या तळाशी शेवाळ आहे
खरूज झाल्यासारखे, ओशट ओशाळवाणे....
शेवाळ खरे म्हणजे केव्हाच व्याले आहे
आळयांचा बुजबुजाट किड्यांचा गजबजाट.
शेवाळ चालणार आहे आळयांच्या पायांनी
शेवाळ उडणार आहे ॲनाफिलिस पंखांनी
शेवाळ चढणार आहे जंगलाच्या माथ्यावर
शेवाळ वाढणार आहे कॅन्सरच्या वेगाने
शेवाळ गट्ट करील गगनगामी वृक्षांना
शेवाळ मटकावील हिंस्र पशुपक्ष्यांना
कोणी म्हणतात
शेवाळाखाली दबेल कॉंक्रीटचे जंगल
त्या दिवशी
आपले हरवलेले आभाळ आपल्याला परत मिळेल

मी ऐकतो त्या शेवाळाची खसफस
मराठी माध्यमातली
मी ऐकतो ती कीटकांची समरगीते
शेवटच्या लोकलमधील घामेजल्या गर्दीत
दिसतात मला त्या कॅन्सरच्या नळ्या
उपाशी पोटांवरील बरगड्यांच्या टोकांशी
शेवटचा सिनेमा सुटण्याच्या मुहूर्तावर
होतात वखवखत्या निखाऱ्यांचे संकेत

आता फारसा उशीर नाही
तोपर्यंत नांदू दे आंधळया प्राण्यांचे
अफीमी अंधारे
कॉंक्रीटचे जंगल

## ५१. शेवटची लढाई

उठा भावड्यांनो ! कुणा प्रेषिताची नका वाट पाहू फुका यापुढे
असे त्राण अंगामधे तो उठा रे ! उद्या राह्यचे फक्त मेले मढे
न लब्धप्रतिष्ठांचिया गोड थापा, न पोथ्यापुराणे पुरावी तुम्हां
न सिद्धांत पर्यंक-विद्वद्वरांचा जगत्क्रांतिचा मार्ग दावी तुम्हां

उठा नागड्यांनो ! तुम्हांला न भीती, कधींचीच अब्रू असे फुंकली...
वृथा शिष्ट संभावितांची तमा का ? कुले खाजवा दाखवा वाकुली
कुणी संस्कृतीचा धरी आड पंचा नको तेथ आहे जरी फाटला
असे कोरडा मंत्र त्यांच्या मुखींचा, झरा अंतरीचा पुरा आटला

गटारामधे स्नान ज्यांना घडावे, जिथे भोजना नासलेली शिते
जिथे फाटक्या लक्तरांच्या मिजासी, जिथे घासलेटी टिनांची छते
जिथे इष्क रस्त्यात सस्त्यात चाले, जिथे मृत्यु सर्वा जिवांचा सखा
तिथे शुष्क वेदान्त सांगेल त्याला हवा पायिंचा एक—सांगे तुका

उठा बापडे भाबडे नागडे हो ! भुते जागवा सर्व रक्तातली
पुरा सूड घ्याया धरा चूड हातीं, घडी तातडीची असे पातली
उरे एक चिंधी तिचा पूज्य झेंडा धरा फाटक्या अंगकाठीवरी
पुकारा करा शेवटाची लढाई लढू प्राण अंगांमधे जोवरी

## ५२. सावंत !

सावंत,
किती वर्षांनी भेटतो आहेस मला !
स्वराज्य आले आणि जुनेदेखील झाले.
चले जाव पुकारणारा
तुझा इरसाल म्हातारा केव्हाच शांत झाला
सकाळी दुपारी...तू कुठेच दिसला नाहीस
सिंहासने पुन्हापुन्हा भरली आणि पुन्हापुन्हा रिती झाली
मैफलीत तुझा पत्ताच नाही !
खरे सांगू ? मीही तुला विसरून गेलो...
तर आज तू उभा.
सावंत,
        तू कुठे होतास ?
सावंत,
        सावंतच ना तू ?
अजून डोळ्यापुढे चित्र आहे
तट्ट फुगताच शर्टाची बाही फाडणारे दंड
बार बार उडून लाल झालेल्या
रिव्हॉल्व्हरच्या अग्रासारखी तुझी बुबुळे
दोन्ही फुप्फुसांत हिंमत उदंड
आणि खळाळत उकळी फुटणारे हासू
सुकलास तू सावंत,
फक्त डोळे पूर्वीपेक्षा ओलसर जरासे
आणि कदाचित सगळा अंगार
हाडांच्या फुंकण्यात...

सावंत, आठवते तुला...
कसाऱ्याच्या जंगलात भयाण रात्री
डासांच्या संगीत संगतीत
पावसाच्या एकठाय लयीत
तू शीळ घालायचास बेदरकार
'साल्या...ऐकेल कुणी' म्हटल्यावर
मुद्दाम ताशासारखा हशा बडवीत
मला म्हणायचास
बम्मनका बच्चा आहेस बेट्या
सावंत....मलेरियाने तुला पंक्चर केले म्हणून
नाहीतर त्याच साली
इंग्रजाची ऐसी की वैसी व्हायची होती....
तुला खरे सांगतो सावंत
हिवाळया पुलाखाली डायनामाइट पेरायची
कल्पनाच केवढी ग्रेट होती
मोतीराम फितूर झाला नसता तर
पंजाबमेल सह्याद्रीने गिळली असती
कसला पचकन थुंकलास तू
त्याच्या नावावर
तो आता मंत्री झाला आहे, सावंत
दचकतोस कशाला?
तोच काय....गुरखा गोळी झाडणार म्हणून
चड्डी खराब करणारा आपला शिरसाट
ताठ पुढारी झालाय आता
जग फार बदलले रे सावंत
जाग्रण करून स्वप्न रंगवायचे दिवस

केव्हाच विरघळले.
आता कंत्राटदारांचे राज्य आहे भैया !
ठेकेदारांच्या ठेक्यावर झुलणारी दुनिया
तुला दारात उभे करणार नाही.
खरे सांगतो. . . .मीही बदललो आहे
पोट पहा ना सुटले किती
बुडाखाली मोटर आली
म्हणशील का आता मला
लुकड्या
पोलादाची कांब कधी मोडते का नफऱ्या !
कबूल, सगळे कबूल, सावंत. . . .
खरे सांग एकदा
आता म्हणत होतास ते खोटे आहे ना ?
नाही ना तुला क्षय झालेला ?
नाहीस ना तू हातभट्टीच्या झंझटात ?
नको रे होय म्हणूस. . . .
परदेशी सोन्याच्या चोरट्या आयातीत
खरेच का आता तू सामील होणारेस ?
व्हेंडॉरचा लायसेन्स खरेच हवा आहे तुला ?
खरेच तू कोणाला लाच देणारेस ?
सावंत, सावंत, सावंत ! नाही म्हण. . . .
नाही तर होय तरी म्हण झडझडून
सावंत
तू फक्त गप्प बसू नकोस
भ्रमिष्ट भुतासारखा. . . .
सावंत तू काहीतरी बोल, प्रचीत दाखव,

पटव मला—तोच तू सावंत म्हणून
खिशात खुशाल हँडग्रेनेडचा अननस ठेवणारा !
सावंत, तू सावंत नाहीस. . . .
अरे निदान थुंक तरी पचकन
शिवी तरी घाल एखादी
अंगातली रग आणि तोंडातली शिवी
दोन्ही हरवून बसलास ?
माझ्याशी तसा बोल, पंचवीस वर्षांनी. . . .
नाही तर सावंत,
चले जाव
चले जाव आमच्या फोपशा स्वराज्यातून !

## ५३. सिंदबादची अखेरची सफर

काय सांगू माझ्या मित्रांनो...
जागा झालो तो अद्‌भुत उजाडलेले
दाही दिशांना सोन्याचा रंग होता.
आणि प्रत्येक डोंगरामागून
सूर्य उगवेल असे वाटत होते.

एकाएकी आकाश भरून काळोखी दाटली
आणि कडाडली आंधळी वीज.
भेदरलेले डोळे आम्ही उघडले तो काय
कैक वर्षांचा इमानी वाटाड्या
मरून पडला होता.
दिसायला दुबळा पण भक्कम बळकट
विश्वासू वाटाड्या गेला बिचारा
आम्ही पुढे निघालो. कारण आपल्याला जावेच लागते.

पुढच्या पुढच्या पडावांवर नवे नवे
वाटाडे शोधीत राहिलो. आणि तसे ते
मिळतही गेले.
पण....
पण वाटा चुकत गेलो की कसे
ते आठवत नाही.
आठवतात त्या गर्द धुक्याने काठोकाठ
भरलेल्या दऱ्या,
आठवतात त्यांतून येणारे भुकेल्या
श्वापदांचे हिंस्र आवाज.

किर्र रानांतल्या खुनशी शिळा
आणि पायाखालच्या गवतातून
सरपटणाऱ्या जिवाणूंची खसफस
तरी पुढेच गेलो. कारण आपल्याला
जावेच लागते.
तशी यात्रा खूपच झाली.

केवढी तरी लंबी सफर.
काय सांगू दोस्तांनो,
एकदा वाटले की संपली ती अंधाऱ्या
जंगलातील भयानक वाटचाल
समोर केवढे तरी माळरान होते.
आणि आता रस्ता भला रुंदावला होता.
पण माझे नशीबच कसे ते पहा !
जिवलग दोस्तांची बुद्धी फिरली.
कुणाला सरळ रस्ता आवडेना
' वाटमारीतच गंमत आहे, ' म्हणायचे !
कोणी वाटेतल्या मुक्कामांवर पाले
ठोकून दुकाने थाटली
आणि कोणी बोके संन्यासी होऊन
वाटेवरच्या मठांचे अधिपती झाले.
मी पुढे गेलो. कारण आपल्याला
जावेच लागते.

सात पहाड ओलांडले.
सात समुद्र उल्लंघले.

साठ नद्या आणि असंख्य नाले पार केले
वाटेत थांबलो नाही. कारण
पहिल्या वाटाड्याने सांगितले होते....
थांबू नका. चालत रहा. मंजिल दूर
आहे. तरी पण चालत रहा. मागे
परतेल त्याची शिळा होईल. मी चालत
राहिलो.
तशी एकजण म्हणाला तू असा असा
आणि इकडून तिकडे जा.
मग तुला एक बगीचा दिसेल.
आणि एक द्राक्षांचा मळा. तसेच एक
सराई आरामशीर. आणि हे, तसेच ते...
तशी मी तसा तसा आणि तिकडून
तिकडे गेलो. तेव्हा मला एक प्रचंड
वाळवंट मात्र लागले. अवतीभवती
रेतीचे प्रचंड ढिगारे. करडे. उंदराच्या
रंगाचे. उदी. उंटांची थडगी. तांबडे
ताज्या रक्तासारखे. पांढरे फटफटीत
कपाळांसारखे. दिशा हरवल्या.
सगळीकडे सारखेच दिसायचे
आपली छाती तशी मुशाफराची
तरी पण धडधडायची
रात्री तर घराची याद यायची यार.
कुठून निघालो असं व्हायचं. भास
व्हायचे दिवसा...आँधी. रणरण

पाण्याचे न मिळणारे तळे. तरी पण
चालत राहिलो कारण....आपल्याला
जावेच लागते.

मग हा तांडा भेटला. तांड्याचा नायक
म्हणाला, चल. पण निमूटपणे यावे
लागेल. तुझी आणि आमची मंजिल
एकच आहे.
आम्ही तुला तुझी स्वप्ननगरी दाखवू.
रस्ता हिऱ्यांच्या रानांतून जातो,
माणकांच्या तळ्याकाठाने. पाचूच्या सात
बेटांपलीकडे जावे लागेल. मग तुला
एक चोवीस कॅरेट सोन्याचा पर्वत
दिसेल.
त्याच्या शिरावर जाईपर्यंत
एकाही रत्नाला हात लावायचा नाही.
रत्ने आम्ही गोळा करणार. चूप !
का म्हणून विचारू नकोस, प्राण गमावशील.
प्रश्न विचारायचे नाहीत. जय म्हणता
येतं की नाही ? तेवढं म्हणायचं. तेही
सांगू तेव्हा.
काय करणार ? जीव तर प्यारा असतो
माझ्या दोस्तांनो !
मग त्या तांड्याबरोबर पुढे आणि पुढे
निघालो. कारण आपल्याला जावेच
लागते.

एका पडावावर तांड्याच्या प्रमुखाला
म्हटले, मला पडून राहू द्या.
माझी दमछाक झाली आहे.
नेमकी पूर्व दिशा कोणती ?
मला मंजिल नको. मला घर पाहिजे.
मला द्राक्षांचा मळा नको.
        माझे वावर द्या.
तुमची रत्ने तुम्हांला घ्या.
        मला माझे प्राण हवेत.

दुसऱ्या दिवशी मला टाकून
        तांडा निघून गेला.
त्याच्या पाउलखुणा बुजलेल्या होत्या
मी माझी परतीची वाट धरली, पण
चुकून तुमच्या या शहरात आलो.
माझ्या मित्रांनो !
        नेमकी पूर्वदिशा कोणती ?

## ५४. आमच्या पणतवंडांना एवढेच सांगा की

आमच्या पणतवंडांना एवढेच सांगा की
रग आहे म्हणून थुंकू नका थडग्यांवर
हिंमत नव्हती म्हणून किंमत करू नका
मुख्य प्रश्न जगण्याचा एवढे विसरू नका
खरे आहे, आम्ही तसे मूळचेच डरपोक
पोक पाठीमधे जन्मल्यापासूनच !
वारा फिरला तेव्हा आम्ही पाठ फिरवली
पोट सांभाळायला हेच केले पाहिजे
कच्च्या रंगांच्या टोप्याच बऱ्या पडतात
निदान मानेवर मस्तक पक्के राहते.
बरे का बाळांनो, कपड्यांचे तंत्र असते.
देहाच्या चोचल्यांचे एवढे काही नाही.
कमान केली जरी मुजऱ्याला वाकण्यासाठी
तुमान टिकली पाहिजे ! फाटता कामा नये.
मुख्य जगले पाहिजे; दुसरे पुढची पिढी !
ती तयार केली पाहिजे पुढेही जगण्यासाठी
वाकावे झुकावे सरपटत निसटावे
बुळबुळीत अंगाने, जमेल त्या रंगाने,
नाना कपटे करून, मुखवटे लटकावून
जगावे जुगावे, जगवावे जुगवावे
आमच्या युगात आम्ही असेच जगलो असू
म्हणून तर आहात इथे... थडग्यांवर थुंकायला !

## ५५. श्रावण

आला पाउस गेला पाउस
उन्हात खेळे अल्लड शिरवे
रेताडाच्या छाताडावर
कुरळ वागडे हिरवे हिरवे

उंच उधळली वर्खी वैले
टेकावरचा पिऊन वारा
तुकतुकलेल्या म्हसरांनाही
मानवला की ओला चारा !

आभाळाने कात टाकली
स्वच्छ निवळले खाचरडोळे
गुबऱ्या गवती गादीवरती
तान्हे गाढव मजेत लोळे

कुणास ठाउक कुणी ठासले
उंच नळ्यांतुन हिरवे पाणी
त्यांच्या टोकांवर फसफसला
फेस कसा निशिगंधावाणी

खुळे पाखरू... त्यास कळे ना
कोठे जावे....खाली ? वरती ?
तिथे खुणावी निळे गगन तों
इथे खुणावी हिरवी धरती !

## ५६. जॅकरँडा

जॅकरँडा जॅकरँडा
वाट भरून घाट भरून
बागांमधून जागा धरून
इथेतिथे जिथेतिथे
वळणावरून फिरून फिरून
खूप खूप जॅकरँडा

उन्हामधे कात टाकून
अंगणामधे न्हाऊनमाखून
सावलीमधे जांभळी झोकून
रंगानेच अंग झाकून
उंचनिंच जॅकरँडा
ओठीं चित्रपंखा धरून
छत्रीखाली जॅकरँडा

कोपऱ्यावरती खुणा करीत
आव्हान देत जॅकरँडा
पक्के शिक्के जॅकरँडा
डोळेभर जॅकरँडा
डोकेभर जॅकरँडा

हाडामधून घसरणाऱ्या
नसाभर पसरणाऱ्या
मणक्यांमधे मणीमणी
वरवर सरकणाऱ्या
रंगरस जॅकरँडा

ऊर्ध्वमुख जॅकरँडा
सहस्रशीर्ष जॅकरँडा
इथेतिथे जिथेतिथे
उघड उघड जॅकरँडा
फुप्फुसांच्या कप्प्यांमधून
लप्पे छप्पे जॅकरँडा !

## ५७. मांडूचा दिवस

फळाविण फळणारा माळव्याचा माळ
विंध्याचे करपले कडे
नेमाडच्या मैदानात रेतीचा जाळ
रानोमाळ उल्कांचे सडे
निष्पर्ण शाखांच्या धापावल्या जिभा
भिंतींच्या बुभुक्षित नजरा
थिजून बसलेल्या दगडांच्या सभा
पारव्यांना उन्हाचा पिंजरा

विराण वैराणात एकाकी उभा
मनातला पराभूत यक्ष
पिंपळाने चिरलेला पाषाणी गाभा
फाटलेले बहादूर वक्ष!
इथेच मावळले पठाणी खंजीर
वीणेवर उगवता झंकार
मिरवली उन्मादात घुंगरांची जंजीर
दुमदुमता दुराणी ओंकार

एका रूपमती ठुमरीचा गंधार
उजळतो दिलवरी दुनिया
पुढे मग...पुढे मग... भर दिवसा अंधार
नर्मदा? विजेची छाया!
अकालसंध्येने काजळले कडे
घुमटात घूत्कारले घुबड

तळ्याच्या पाळीला जिन्हारीं तडे
विंध्याचे लटलटले कुबड !
खदखदून हसली ही तटांची रांग
धडधडले बुरूजाच्या बहालात
जामा मशिदीमधे थरथरली बांग
पडसाद ये दाईच्या महालात
माझ्या अंतर्यामात पुटपुटला वेताळ
ऊठ या स्वप्नांवर थुंकून
फोड ती वीणा, फेकून दे टाळ
सुखात लोळावे भुंकून

उतरतेच अखेरीस तानेची झार
मातीतच परततात मृदंग
खुशाल का स्वीकारता ताटीचे दार
इतके का मरण सवंग
लाल पाषाणांना फुटतात दोन जिव्हा
पाच्छाचा झिंदाबाद होतो
मैफली संपतातच केव्हा ना केव्हा
' जयजय ' वर जगतो रे जो तो !

## ५८. मांडूची रात्र

पहाऱ्याचे बारा टोल वद्य अष्टमीच्या माथ्यावर पडले
डाकबंगल्याच्या उभंड खिडकीतून दोन उन्निद्र डोळे उडले
उगीचच जागणाऱ्या पारव्यांनी अलगद चाळवल्या घनाकार सावल्या
सताड दारातून ताणून बघू लागल्या तारवटल्या डोळयांच्या भावल्या
धुकट तलावात सूर मारला तोच फिकट चांदण्याने
संकेताच्या टाळ्या सवयीने वाजवतात पिवळी पिंपळपाने
मुंजसागराच्या शेवाळी पाण्यावर तडतडले तवंग
एक मुंजा उभा—त्याच्या तळहातावर नक्षीचा पलंग !
जादुगारापरी विकट विकट हासत उभा तिथे मुंजा
पाचशे पऱ्यांना जन्म देऊन गेला उघडताच पंजा
डाकबंगल्याच्या छपरावर उतरल्या बिनछपरी डाकिणी
बुरख्याच्या फटीतून वाकडी सारंगी काढून छेडली एक रागिणी
नागिणी पिवळयाधमक फूत्कारत उडाल्या रुपेरी पंखांवर
घुबडाने घोषवले, ' निगा रखो, आ रहे हैं परवरदिगर '
जिगर दगलबाजांच्या घोळक्यातच सुलतान खुदखुदत गेला
मानेवर शीर नाहीच ! तिथे एक नक्षीचा शराबी पेला
पुढे मग कवायत—एक दो... निकाल दो कटयार खुनी
एकमेकांच्या उरात घाला, मुकुट ठेवा, काढा कुणी...
पाकोळींने फडकावलीन् दोन काळी निशाणे काळोखात
तोच जोहार झाला पूर्वेकडच्या जनानामहालात

कटात वाकबगार दगडांनी बंद केली चोरदारे
अगदी कोवळ्या मनाचे फिरू लागले मोकळे वारे
जडगार शिळा झालो, डोळे कोसळले बिछान्यावर
मांडूच्या डाकबंगल्यातला बेरर आला परवरदिगर !

## ५९. शांतिनिकेतन : प्रथमदर्शन

ज्या मातीने प्राशन केली त्याची नीरव पाउले
ती भरून घेतली आज मी भांगात
रेशमी राजवस्त्रांवर झुलला जो वारा
त्याची उटी केली अवघ्या अंगोपांगांत.
सुस्नात उतरली अर्वाचीन संध्या
त्याचाच पांघरून भगवालाल शेला.
आणि प्राचीने माळला
नूतनगंध झेला.

मोकळे गायचे होते मला फुप्फुस भरभरून
पण माझी वीणा मुकी झाली आज.
एरवी थिल्लरपणे थरकणाऱ्या सुरात
कुठून दाटली आहे अनामिक लाज ?
विशाल आकाशाच्या अदृश्य छायेखाली
तुकडाभर चांदवा झाकळून गेला.
एका बंद एकान्तात
दरवळली बेला.

ओळखीचे वृक्ष इथेच का धरतात चित्राकार ?
इथल्याच अंधारात हलतात आभास...
इथल्या मौनाआत गाजते आनंदयात्रा.
कृतार्थ होतो इथे तीर्थांचा प्रवास.
इथे तो होता, तो आहे, तो असेल...

इथल्या आभाळाला त्याचीच वेला
तो पहा... तिथे अंधारसाखळीतून
सुईकिरण गेला.

केवढे तरी आश्चर्य, एक मृत्युवश माणूस
भारून ठेवतो या वास्तूचा आकार.
वर्तमान त्याचेच अन् आगामी काळात
त्याचे झणझणतील अनाहत झंकार.
पिढ्यांच्या गुढ्यांवर त्याची किरणे
येतच राहतील अज्ञात उगमातून.
परा पश्यन्ती पिणारा ॐकार
छेडील तो आतून.

## ६०. आदिरहस्य

आज विश्वरचनेची पाहून घेतली रंगीत तालीम
आदिरहस्याने दिले मला एकवार दर्शन
निराकारा आकार देते तेजाबाचे तेज जालीम
पोलादाचे पंख छाटीत चालू होते वज्रघर्षण
लाल जिभा, लाल जटा, अग्निदेव अप्रमेय
आकाश भरून वारा फुंकील एवढा मोठा वीजविंझण
किती तरी योनींमधून परिभ्रष्ट कार्तिकेय
अगदी तसे ज्योतिर्मुख सहस्राक्ष लोहइंजन

विश्वाकार मेघ जसा 'बहु स्याम्' गर्जत उठला
स्फोटायमान पोलादाचा थेंट तसा निळा लोळ
सूर्यस्फटिक पेरण्यासाठी आदिमहासूर्य फुटला
तसा इथे द्रवीभूत अग्निप्राय लोहगोळ
अहा अहा ! पहा तरी निळेनिळे शुक्र शंभर
तेजःपुच्छ धूमकेतू ! एवढया उल्का कोण मोजील ?
स्वयंचलित विश्वमाला, नवनिर्मित अमित अंबर...
कोण यांच्या ऋचा रचील ? कोण नवे यज्ञ योजील ?

अनुप्राणित अणुरेणू जेव्हा नानाकार झाले
थेट अशीच घडामोड तेव्हादेखील घडली होती
अमीबा ते दिनासूर एका क्षणात जुळून गेले
यदृच्छेने चैतन्याची गाठभेट पडली होती...
कुणास ठाऊक पुढे काय ? एक दिवस असा येईल,
तथाकथित जडाकार करू लागतील चलनवलन

आम्हा धक्का दिला ज्याला तेच चाक कुठे नेईल ?
कुणास ठाऊक ! उत्क्रांतीचे हेच असेल नवे स्फुरण !

पहा इथे, भूमीमधून ताठ मान वर करून
विद्युन्मंत्र देत घेत एक मिनार उंच उभा
नसानसांत ईथरवाणे पेट्रोलियम भरभरून
सूर्यचुंबी पतंगांची धडक बसते नव्या नभा
स्वाहाकार किती होवो, एक तिथी अशी येईल
यज्ञकुंड भूकभूक तेव्हा देखील करीत असेल
उरले सुरले जुने जग...त्याची शेषाहुती होईल
कृतार्थ खापरपणतू समाधानामधे हसेल

का नाही हसू त्याने ? त्याच्यासाठी कोण बांधील
अदृश्य किरणांचा सूर्यापर्यंत गगनझूला
ज्याच्यावरून जाईल त्याची मनोवेग ॲटममोबील
प्रियेसाठी घेऊन येईल मंगळावरील लाल फुलां
त्याची मुले करीत बसतील गणित एक पार नवे—
...प्लूटोपासून पृथ्वीपर्यंत सूर्य दिसला हजार वेळ
तर दर सेकंदाला वेगमान काय हवे ?...
—त्यांतले एक पोर म्हणेल, हे गणित की पोरखेळ ?

त्याच विराट विश्वाचा हा इथे आहे मूळ वाफा
पहा तरी पोलादाची निळी काळी बागशाही...
जागोजाग आग फुले, रातंदीस उभा ताफा
गुल्छर्डाहून वेल्डिंगवेली कमी शोभिवंत नाही
भुईवरती बकुळफुले द्रवले त्यांचे दंतुर दात

नटमोगरे ढाळत आहेत पोलादाचे नाजुक पराग
चिमण्या-देठावरती उले केशरी कमळ आभाळात
लोखंडाच्या चाफ्यावरती मिणमिणणारे सोनचिराग.

जशी जॅकची वालीवेली उंच उंच चढत गेली,
तशी इथली परसबाग वाढणार आहे दाट दाट.
तुमच्या भ्रष्ट मंदिरांची फार दिवस गय केली
याच्यापुढे ईश्वराला जरा मिळणार नाही वाट
दुसरी खूप कामे आहेत : शीतगृहे सूर्यावर,
चंद्रावरती अणुभट्टी, शुक्रावरच्या प्रयोगशाळा...
चवथ्या सूर्यमालेकडला रस्ता तयार झाल्यावर
पाठवायचे आहे तिकडे मजेसाठी तान्ह्या बाळां !

' धन्य धन्य आहे यांची ', म्हणा जरा मोकळया स्वरात
वेगळे असले तरी तुमच्याच वंशवेलीवरचे तुरे
जाणारच आहे वाहून तुमचे सारे नव्या पुरात,
तरी देखील शाप बंद ! षंढ पुटपुट आता पुरे
तुम्हीच त्यांचे बूस्टर बरे ! रॉकेट गेले, आता जळा !
दिशा ठरली वेग ठरला नवे विश्व त्यांच्यासाठी
सूर्यचंद्र त्यांची कुळे, त्यांना नको तुमचा मळा !
बाण काय रॉकेट काय पुन्हा येत नसते पाठी !

त्यांना नको आशीर्वाद, तरी म्हणा, ' सुखी असा '
आणि मौन धरण्यापूर्वी त्यांना आपले एवढे पुसा
... सारे चंद्र तुमचे असोत, चांदण्यात फिरणार ना ?
कधी काळी दुःख झाले कुशीमध्ये शिरणार ना ?

पहिल्या सूर्ययात्रेपूर्वी कडकडून भेटाल बापा ?
यात्रिक परत येताक्षणी आई घेईलच ना पापा ?
मन येईल उचंबळून पाहून बाळ गोजिरवाणे ?
गणित पुढले करीत असता कधी गुणगुणाल ना गाणे ?

त्यांनी नकार दिला तरी होऊ नका बापुडवाणे !
त्यांना त्यांची गति प्रिय तुम्हा जसे तुमचे गाणे
विश्वास ठेवा, एक दिवस लोहमिनारपूजा होईल
नवा सूर्य दिसताक्षणीं कोणी उषःसूक्त गाईल
सप्तग्रहीं फिरता फिरता प्रेमिकांना ओढ लागेल
नेपच्यूनकडला चंद्र पाहात गुरूवरचा कवी जागेल
एकटे कोणी राहणार नाही परार्धाच्या सूर्यांवरती
बहु स्याम् म्हणत म्हणत गजबजेल पुन्हा धरती !

## ६१. पत्र

माझ्या मित्रा,
तुला म्हणतात निसर्गाचा कवी
तुझी चित्रे रंगधुंद, तरल, नाजुक, नवी
आठवतात मला तुझ्या घुंगुरवाण्या ओळी
पांगाऱ्याची कॅशिओची फुले तुझी भोळी
शब्द शब्द रूपस तुझे श्वास देतोस त्यांना
दवासारखा ताजा स्पर्श तुझ्या प्रतिमांना
( थिल्लर उपहासासाठी बोलत नाही काही
तुझ्या रसवंतीची भूल पडलेली मलाही... )

पण मित्रा, निसर्गाने फसवले रे पुरे
इथे त्याचे रुद्ररूप प्रकट झाले खरे
मायाऱ्याची माया तिथे तुला मला दिसे
तोच इथे भय घाली आणि लावी पिसे
असे करा...गावाकडून ईशान्येला निघा
हजार कोस. डोळे मिटा...उघडा...पुढे बघा
गांडीव गळेल हातामधून; थरथर करील अंग
बरगडीतील उंदराचाही फटक होईल रंग

अरे, इथल्या पर्वतांना कर्वतीची नखे
लक्ष युगांपूर्वी त्यांची बंद यक्षमुखे !
तरी कधी गात असतात, सावध...ऐक जरा
मौनामधून पडत जातो पीळ त्यांच्या सुरा
आपल्यावाणीच असतात त्यांची आत्ममूल गाणी
रुखेसुखे जळत असून अंदर असते पाणी

सूर्याएवढे चढे सूर, काल ह्याच ताल...
ऐक ऐक...( मात्र आधी पुसून घेई भाल ! )

तीन हजार हात उंच पाषाण दिसतो पुढे
तें तर एका मंडुकाचे आहे महामढे !
एकदा त्याने गरूड म्हणून गिळून टाकला ढग
लाख विजा लावून गेल्या मर्मोमर्मी धग
तेव्हापासून तोंड वासून बसून आहे बेडूक
मांस-चर्म झडून गेले उरले आहे हाडूक
तरी देखील जागी होते काळभूक कधी...
मेंढ्यासकट मेंढपाळ गडप झाले मधीं !

दिसतात तुला लांबलांब उंचउंच रांगा ?
त्या तर एका लक्षस्तनी राक्षसीच्या टांगा
आदि-आदित्याने तिची तोडली आहेत शिरे
( आभाळात एक एक धूमकेतू फिरे )
शांत शांत पडली तरी जिती आहे घूस
कधी काळअवस येता बदलत असते कूस
स्तनांजागी पाठ येते, उपडे पडे ढुंग
कवी म्हणतो पर्वत किती सुंदर आणि तुंग !

अब्जभर वर्षे झाली, आली एक मगरी
तिने यक्षराक्षसांची गिळून टाकली नगरी.
शंभर सोंडे महाहत्ती गिळले तिने लाख
( ' गोबी 'मध्ये पडली आहे अजून तिची राख ! )
त्याच यक्षराक्षसांची हाडे झाली झाडे
त्यांना झाकून पडले आहेत हत्तींचे सांगाडे

मौज अशी — आपण असतो चालत त्यांच्यावरून
मवाशी मी उतरलो ना सोंड हाती धरून !
युगांच्या या समाध्यांची आहे कोणा जाण ?
अस्थि आणि अश्म यांचा एक असतो प्राण !
घोट्यांवरती घोटीव घरे गुडघ्यावरती मठी
रस्त्यासाठी बरी असते कवटीवरची अठी
आणि कुठे खब्रदाडात चरबी तशीच असते
तिथे ' गार गालिचांची हिरवी ' माया दिसते
...काळरात्री समंधांची प्रजा बोटे मोडी
तेव्हा कधी वास्तवाची खूण पटे थोडी !

उंच उंच तेढीमेढी माथी जागोजाग
त्यांच्यावरती थिजून बसते थंड ओली आग
सूर्याशिवाय फुलत नाही इथे दुसरे फूल !
एकांतात रडत असतो पर्णहीन शूल !
फळाफळा वाळू टाकत जातो उन्हाळ वारा
गारगोट्या होऊन गेल्या हिमयुगीन गारा
चैतन्याचे वैरी गिरी उभे दोन्ही पार
एक ' सिंधू ' भलाईच्या ढिलाईची धार !

युगे झाली, सिंधू तेव्हा धावत होती इथून
( मात्र तिचे सागराशी जुळले नव्हते मिथून ! )
अंधाराची शिळा होती वाटेमधे उभी
खवळलेली सिंधु गेली चढत सात नभीं
हिसळणाऱ्या गिरमिटांनी ढिसाळ केली शिळा
तिने केला मऊ ओल्या अंधाराचा पिळा

सुकत सुकत झाले त्याचे काळेकरडे कडे
थरथर थरथर कापत अजून सिंधूपुढे खडे !
पहा कसे सारे इथे बदलतात रूप
सुंदरांची चर्या इथे विकट होते खूप
तुला वारा माहीत आहे ... मुरली वाजवणारा,
हिरव्याकंच पोफळवनात धूम माजवणारा,
मॉन्सून म्हणून निळाईचे दूध पाजवणारा ...
तोच इथे पहा तरी होतो कसा न्यारा
गर्भवती गोव्रीचेही पोट भाजवणारा
खर्रम्-खुर्रम् काराकोरम् पाठ खाजवणारा !

तरी इथे होत नाही पुरा मनोभंग
जीवघेण्या निसर्गाचे तीनतेरा रंग
कोस कोस जांघ अशी जांभुळभुरकी दरी
कापुरकापुस पांढरा निळा तिच्या शिरावरी
भगभगीत भगवी माती ऊदपिवळा कडा
काळयाभोर कुरुंदात ज्वालेलाल तडा
हलाहल–कुसुंब्यांचा झाला इथे संग
तेव्हापासून उधळलेला असा मॉव्ह रंग

तोच हा ? अन् हाच तो ? सारी लपाछपी
नटारंगी मदन तिथे, इथे बसे तपी ?
कुठे चूकभूल आहे ?... ज्याला जीवमाया...
तोच इथे प्राणाचाही सजे प्राण घ्याया ?
फूलपाखरांच्यासाठी तिथे फुलीं फुले
साळुंकीच्या सुखापायी हिरवेहिरवे झुले !
तोच कसा रुद्ररूप कालरूप होतो
तुझ्यामाझ्या चैतन्याची आणभाक घेतो !

## ६२. लामा

दाढी लागे वाढी आणि मिशी जशी दाभण...
कामापुरते लामा येती ! लामण सदा गाभण !!

ॐ मणिपद्म ! सदा लामामुखीं नाम
विणे आणि विणणे हेच लामणींचे काम !!
छोट्या छोट्या लामुल्यांना पायघोळ झगे
हातामध्ये धर्मचक्र, नाकामध्ये फुगे !!
एक दिवस कौल होता लामा होतो गुरू
मग मात्र अधून मधून ब्रह्मचर्य सुरू !!

## ६३. भीष्म

या नव्या मुलखात जेव्हा वाढते काळोखपाणी
का अशा वैराणवेळी दूर ऐकू ये विराणी ?

श्रांत शांती भोवताली झोपले चैतन्य भोळे
जागत्या डोळ्यांत तेव्हा का जमावे मौन पाणी ?

पावलांना शीण आला झोकली निर्माल्य काया
कोठुनी येतात तेव्हा ओळखीची गूढ गाणी ?

आजची उध्वस्त घाटी वाटही तेढी उद्याची
सर्व काही जाणणारी तू विवेकी तू शहाणी

हा इथे घायाळ मी गे संपली बाजी पुराणी
मी क्षणांच्या पंजरीं अन् दूर तू पाताळपाणी

## ६४. मी जिथे जातो तिथे

मी जिथे जातो तिथे नेतो तुला माझ्यासवे
कल्पनेच्या दूरतेने लोचनी का आसवे

मी तुला बघतो, वसंतीं मेनके ! हसतेस तू
मेघमल्हारातही अभिसारिके असतेस तू
चंद्रिके शरदातल्या ! तू मजसवे भिजसी दवे

नग्न मूर्तींचे अपापी रूप डोळा रेखता
भग्न दुर्गांच्या उरींच्या मग्न आशा देखता
आपल्या आशानिराशा......सर्व काही आठवे

दाटल्या दर्याकिनारीं एकटा अनिकेत मी
आठवी जन्मांतरीचे ते तुझे संकेत मी
दूर कोठे त्या क्षणांची संथ जाती तारवे

मी तुझ्या डोळ्यांतुनी सौंदर्य सारे पाहतो
मी तुझ्या कानामनाने गीतकाव्ये भोगतो
मीच तू अन् तूच मी हे काय सांगावे नवे

## ६५. डोळेभेट

अनोळखी देशाची आटपाट राजधानी
दुथडी वाहणारा दुधारी राजरस्ता
सभोती गर्दीची बेगुमान वर्दळ
मध्ये मी. एकटा. अनेकांत एकाकी

अनोळख्या रंगाचे असंख्यात डोळे
तल्लख आदिवासी तिरकमठे रोखलेले
सहज शत्रुत्वाच्या शिळेवर पाजवून
आदिम संशयाच्या विषाने माखलेले

जळणारे जाळणारे असंख्यात डोळे
घेरणाऱ्या वणव्याच्या ठिणग्यांची बुबुळे...
थरथरत्या काळजांच्या टिपणाला टपलेले
ठिपक्याठिपक्यांचे महाकाय बिंबळे !

माझे दोन्ही हात अदृश्य वर करून
बेफिकीर स्मिताचा घेतला मी आडोसा
तेवढ्यात कोठूनसा तरंगत आला हा
आश्वासन देणारा चंद्राचा कवडसा

डोळयांच्या रानातच अचानक उगवली
दोन विशाल डोळयांची लाजाळू पाने
माझ्या डोळयांचे दूरस्थ चुंबन घेत
थरारली फडफडली संजीवक हर्षाने

## ६६. चंद्रोदय

निळयाकोवळया आकाशाच्या सौम्यसावळया दिशा
खुल्या खेळकर दिवसांमागुन खुळया रुपेरी निशा
हळदी हसरे माळ मोकळे हलती झुलती हवा
मोहमधुर मुलखात अनोखी गाव निराळा नवा
क्षणाक्षणातुन फुले उमलली आपण फुलपाखरे
तशात अपुल्या नसांत वाजति नवलाची नूपुरे
ठेव काढुनी कंकण माळा पायींची पैंजणे
तुडुंब भरुनी तरुण फुफ्फुसे चल माझ्या साजणे
स्कंधावरचे निशाण उडु दे खुशाल वाऱ्यावर
अल्लड थिल्लर गाणे असु दे अपुल्या ओठांवर
अखंड बोलत उदंड हासत जाऊ दोघेजण
क्वचित भुईवर अधिरे पाउल ठेवू या आपण
उंच उंच गवतात उसळती कारंजी थुइथुई
खळखळणाऱ्या झऱ्याझऱ्यातुन फुटती जाईजुई
तू आल्यावर दहा दिशांतुन चंद्रोदय होतिल
तरमळ उठतिल लाख तराणे माझ्या प्राणांतिल

# ६७. समज नव्या मातीत मिसळलो

समज, नव्या मातीत मिसळलो, वसंतात तू ये इकडे
फुलाफुलांच्या झुबक्यांमागे चाहुल माझी घेइ गडे

असेल हे आभाळ मोकळे भोळे डोळे जसे तुझे
फळाफळातुन रसरसलेले तारुण्याचे लाख घडे
मंद झुल्यावर समुद्र सुंदर तुझ्या उरापरि झुलणारा
तुला पाहुनी तुरुतुरु येतिल फुशारलेली शुभ्र शिडे
मधेच नवथर संगीताने मंथर होइल चाल तुझी
उल्हासाने किन्नर युगुले नाचत येतिल तुझ्याकडे

जाणतेस मी किती उताविळ असेन पाहत वाट तुझी
नगरशिवेवर निर्जन जागी कधी तुझे पाऊल पडे
पानांमधुनी पिउनि कवडसे मुरडत वेडी वाट फिरे
तू गवतावर शिंपित येशिल तुझ्या स्मितांचे सोनसडे
पाउल पडता ज्या जागेवर थरथर करतिल गवतफुले
तिथे मुक्याने थांब जराशी टकमक पाहत चोहिकडे
संकेताची हाक एकदा घालशील हलकेच मला
...पहा न्यहाळुन लाल झुब्यांतून फुलपंखयांचा थवा उडे...
तीच डहाळी धर हृदयाशी हुंगुन चुंबुन पुन्हापुन्हा
दिसेल तुजला दोन फुलांची नजर तुझ्यावर कशी जडे

येशिल ना येत्याच वसंतीं कामधाम ठेवून दुरी ?
उशीर होता होउन जातिल याच फुलांचे काचखडे...

## ६८. ती कहाणी संपली

यौवनाची स्वप्नभूमी अंतराळीं लोपली
दोन वेड्या प्रेमिकांची ती कहाणी संपली

आजही त्या आठवाने आसवांना पूर येतो
दूर रानीं विंधलेल्या पाखराचा सूर येतो
घेरतो एकान्त तेव्हा अंतरीं आकान्त होतो
भावनाकल्लोळ सारा ना कशाने शांत होतो

पापण्या मिटता दिसे ती चित्रमाला आपली
दोन वेड्या प्रेमिकांची ती कहाणी संपली

...झिंगलेल्या चंद्रम्याने चुंबलेल्या धुंद लाटा...
...नागकन्यांच्या घरांच्या नागमोडी चोरवाटा...
...दूर देशातील गीते आणतो वाहून वारा...
...नारळींच्या सावल्यांनी भारला सारा किनारा...

यक्षभूमी दो जिवांची सांग कोणी शापली ?
दोन वेड्या प्रेमिकांची ती कहाणी संपली

नागकन्येने कुणीशा चांद तो चोरून नेला
ओहटी येता किनारा जादुचा वाहून गेला
पैलतीराहून वेडी का तरीही साद येते ?
खोल गाभाऱ्यातुनी का आजही ती याद येते ?

का स्मृती आता जपावी वेदनेने व्यापली ?
दोन वेड्या प्रेमिकांची ती कहाणी संपली

## ६९. निराळा

उगा कशाला लपवाछपवी आज तुझा हा साज निराळा
चंचल अंचल सावरताना शृंगाराचा बाज निराळा
        नित्यापरि उंचाविसि भुवई
        परिचित या जिवणीच्या सवयी
वरवर भोळे दिसती डोळे...आज खरा अंदाज निराळा
        जासि कुठे...तुज सवाल पुसला
        नकळत नयनीं जबाब दिसला
चतुराईचे उत्तर देता, आज तुझा आवाज निराळा
        सरसावुन शस्त्रास्त्रे सारी
        निघे मोहिमेवरती स्वारी
घमघमणारा गजरा हा तर विजयाचा सरताज निराळा
        नित्याचे रसलोलुप मधुकर
        आज राखतिल सादर अंतर
मदनाच्या राज्यात महोत्सव करणारा युवराज निराळा

## ७०. स्वप्नलता

आली स्वप्नलता बहरास
दोन जिवांच्या मीलनघडिला मोहरला मधुमास
दूरपणाचे सरले बंधन
स्पर्शसुखाचे झरले चंदन
नंदनवनिंच्या कल्पसुमांची बरसतसे शिरिं रास
तोडुनिया देहांचे पंजर
प्राण घालती मिठी निरंतर
मंतरलेल्या मोहनरात्रीं गात्रीं मदनविलास
मोहफुलांचे झेलित झेले
भिडले दो मदिरेचे पेले
युगविरहाचा शोप निमाला शुभमंगल प्रहरास
मन नाचे तन नाचे आतुर
निशेतल्या निमिषांचे नूपुर
झनन झनन घन अंधारातुन झंकृत होत विभास

## ७१. लावणी जुन्या ओळखीची !

मुरलेली मदिरा नागवेलिच्या पानीं
जाणत्या जिवाला हवी जुनी ही ज्वानी

छपवून कशा या छातिल सगळ्या खुणा ऽ ग
तू भिशील कोणा आणि लाजशिल कुणा ऽ ग
मी जुनाच घरचा अनाहूत पाहुणा ऽ ग
भुवईत थरारे अजुन जुनी बेभानी

मी ओळखतो ती गुगली तिरळी छटा ऽ ग
मज ठाउक पुरल्या लोचट लुडबुड बटा ऽ ग
मी भिईन का या बिकट चढाच्या तटा ऽ ग
कुजबुजू काय तो शब्द खुणेचा कानी !

जरि झुकल्या थोड्या घनावळी सावळ्या ऽ ग
जरि सुफलित झाल्या माळावरच्या वळ्या ऽ ग
जरि पिकल्या थोड्या आता जांभुळकळ्या ऽ ग
तरि पालटेल का तुझे रहस्य हिमानी ?

तू कुठून शिकलिस नखरा असला नवा ऽ ग
पाखरास कळते परिचित वनची हवा ऽ ग
जर फसेल संधी, दुसरीची वानवा ऽ ग
चल सोड बहाणे, येई खुल्या मैदानी

## ७२. लावणी कार्तिकाची

“ फिका पहाटेचा चंद्र,
कापे शहनाई मंद्र,
पहिला पक्षी गेला अंबरीं
थंड कार्तिकाची हवा,
कापे पदराआड दिवा,
कुठे निघालीस सुंदरी ? ”

“ अशि अडवु नको वाट,
नको भलत्या वेळी गाठ
मज जाऊ दे मंदिरीं...
कसा हटवादी उभा,
उगा लोकांमधे शोभा,
जाई मुकाट अपुल्या घरी ! ”

“ एकलकोंडा नदीकाठ,
त्यात भंगलेला घाट,
मी सोबत येतो तरी !
ओल्या शेवाळावरून,
जाता ओचे आवरून,
कशि थरथर करि पोटरी ! ”

“ काकड आरतीची वेळ,
तुला नाही ताळमेळ,
किति घालमेल माझ्या उरीं !
येइल किटाळाचा झोत
जाइल विझुन त्यानं ज्योत
तू होशिल दुरच्या दुरी ! ! ”

‘ कसा राहू मी उगी,
यंदा सोन्याची सुगी,
झिळमिळु दे तोरण वरी
माझ्या अंधेऱ्या घरात
येवो चंदेरी वरात
या मंगल मार्गेसरीं ”

“ रहा पाखरा खुशाल,
तुझे आभाळ विशाल,
मज धरणी माझी बरी...”
“ का ग वेढा हा मनात,
चल माझ्या गगनात,
अशि होउ नको घाबरी ! ”

## ७३. लावणी इवलीची

इटुक इवली भिंगरभावली बुब्बुळबिजली काळीभोर
चिटुक चिमणी चुटुक जिवणी खळकन् हासू फुटे बिलोर !

पर्करचोळीमधली पोर
झर्कन झाली फूलटपोर
नाचणनजरी सुळसुळपदरी छळछळ छळते छिंटछिचोर !

डुलत्त होते कालच डूल
आज भुलाबाय घालत भूल
गरगरगिरकी अदमोरमुरकी मुद्दामउद्दाम कुर्रेखोर !

' अग्गोबाय ' ( हे घडीघडी )
' तुम्ही केवढे अन् मी केवढी '
जा तर पळ मग, तिरपिटतगमग करून जाते वर्शिरजोर !

अजुन्तराहेत मोराचे पाय
उगाच्च आपलं चालायचं ठाय
कळत्त काय नाय तेवढ्यात्त हायहाय उद्यात्त लाविल गळ्याला दोर !

## ७४. लावणी अखेरच्या विनवणीची

मैतर हो ! खातरजमा करू मी कशी
अम्हि जाणारच की कधी तरी पटदिशी

काय तरुणपणाची एकेक वेडी घडी
काय धुंदफुंद रंगात रंगला गडी
काय खट्याळ खोड्या एक एकावर कडी
मस्तीत मिजाशित रमलो रात्रंदिशी
अम्हि जाणारच की कधी तरी पटदिशी

अम्हि साधू नव्हतो, नव्हतो योगी कुणी
अम्हि छंदीफंदी नादी नाना गुणी
इष्काच्या पायी कैक जणींचे ऋणी
केलि फसवाफसवी, कितिदा पडलो फशी
अम्हि जाणारच की कधी तरी पटदिशी

किणकिणता कंकण कणकण नाचायचा
रुमझुमता पैंजण जिव वेडा व्हायचा
कधि मैनेसंगे वनभर उधळायचा
दो हातीं लुटली आणि लुटवली खुशी
अम्हि जाणारच की कधी तरी पटदिशी

तुम्हि जीव लावला, मैत्र आपुले जुने
केलेत माफ तुम्हि शंभर माझे गुन्हे
हे एकच आता अखेरचे मागणे
ही मैफल अपुली अखंड चालो अशी
अम्हि जाणारच की कधीतरी पटदिशी

⁂

55483
16·11·76

Library IIAS, Shimla
MR 891.46182 B 228 S
00055483